




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १८८ * नांदेड * गुरूवार, दि. १६ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध होणार?

## ▸ खा. अशोकराव चव्हाण-आ. चिखलीकर एकाच गाडीत; राजकीय समीकरणांची जिल्हाभर चर्चा
## ▸ गोणे, चंद्रसेन पाटील, भोसीकर आदींची माघार

**नांदेड (प्रतिनिधी)**- नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत अखेर बिनविरोधच्या दिशेने हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. त्याचाच भाग म्हणून अनेक प्रबळ दावेदारांनी उमेदवारी मागे घेतल्याने जिल्ह्याच्या राजकारणात समीकरण बदलले आहे. सर्वपक्षीय पातळीवर तडजोडीचे सूत्र पुढे आल्याने तालुकानिहाय बहुतांश जागांवरील तिढा सुटल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. मात्र काही आरक्षित जागांबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याने राजकीय संभ्रम कायम आहे.



नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेत नायगावमधील प्रबळ दावेदार श्रावण पाटील भिलवंडे, लोहा तालुक्यातील चंद्रसेन पाटील, भटक्या-विमुक्त जाती प्रवर्गातील लक्ष्मीकांत गोणे तसेच इतर मागासवर्गीय प्रवर्गातील वनमाला हरिहराव भोसीकर यांनी माघार घेतली. त्याचबरोबर प्राथमिक कृषी पतपुरवठा व विकास सेवा सहकारी संस्था मतदारसंघातून अर्धापूरचे इंगोले लक्ष्मणराव नानाराव, कल्याणकर व्यंकटराव बाबाराव, उमरीचे सरसे सुभाष गणेशराव, भोकरचे बल्लाळकर मारोतराव भोजनना, मुखेडचे देशपांडे व्यंकटराव वासुदेवराव, मुदखेडचे भांगे विठ्ठल दसरत, मगरे सचिन शंकरराव, हिमायतनगरचे वानखेडे चांदराव जयवंतराव, पाळजकर सुरेंद्र कोंडबाराव, अनुसूचित जाती-जमातीतून लोहबंदे मिलिंद व्यंकटराव, रामवळकर गंगाधर माणिकराव, इतर मागासवर्गीयांतून पाटील मंगलबाई रामराव, इतर सर्व सहकारी संस्था व व्यक्ती सभासद मतदारसंघातून शेंबाळे दत्तात्रय तुळशीराम, रॅपनवाड भारत गोविंदराव, धर्माधिकारी माधवराव दिगंबरराव, भटक्या-विमुक्त जाती-जमाती व विशेष मागास प्रवर्गातून रॅपनवाड भारत गोविंदराव अशा एकूण २० उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत.

> दिवसभराच्या घडामोडींमध्ये सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो म्हणजे माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी एकाच गाडीतून केलेला प्रवास!

त्यामुळे अनेक ठिकाणी बिनविरोधची समीकरणे स्पष्ट होताना दिसत आहेत. मात्र नागरी सहकारी बँका व पतसंस्था गटातून श्रावण पाटील भिलवंडे यांची उमेदवारी कायम असल्याने त्या गटाकडेही लक्ष लागले आहे.

तालुकानिहायसंचालकपदाच्या जागांवर तडजोड अंतिम टप्प्यात पोहोचली असली, तरी आरक्षित जागांवर इच्छुकांची संख्या अधिक असल्याने काही ठिकाणी राजकीय पेच कायम आहे. इच्छुकांची मनधरणी करण्यासाठी वरिष्ठ नेत्यांकडून दिवसभर बैठका सुरू होत्या.

गुरुवारी दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत असल्याने अखेर संपूर्ण निवडणूक बिनविरोध होणार की काही जागांवर मतदान होणार, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष मोहनराव पाटील टाकळीकर यांच्या गणेश नगरातील निवासस्थानापर्यंत दोन्ही नेते एकाच चारचाकी वाहनातून जाताना दिसले. त्यामुळे त्यांच्या एकत्र प्रवासाची जिल्हाभर चर्चा रंगली आहे.

सहकाराच्या राजकारणात प्रतिस्पर्धी गटांतील नेते एका व्यासपीठावर किंवा एका वाहनात दिसणे नवीन नाही. परंतु जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या भेटीला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी ही राजकीय समन्वयाची भूमिका आहे की आगामी सहकार आणि स्थानिक राजकारणातील नव्या समीकरणांची नांदी, याबाबत विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

गुरुवार, दि. १६ रोजी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असल्याने बँकेच्या निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. अंतिम चर्चेनंतर किती उमेदवार माघार घेतात आणि बिनविरोधचा फॉर्म्युला कितपत यशस्वी होतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# अजित पवारांच्या जयंतीचा समावेश राष्ट्रपुरुष आणि थोर पुरुषांच्या यादीत

**मुंबई (प्रतिनिधी)**- राज्याचे दिवंगत नेते अजित पवारांची जयंती आता सर्व शासकीय कार्यालयात साजरी होणार आहे. राज्य सरकारने घेतलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयानुसार, माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित अनंतराव पवार यांच्या जयंतीचा समावेश आता शासकीय स्तरावरील अधिकृत राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या जयंती कार्यक्रमांच्या यादीत करण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभागाने १५ जुलै, २०२६ रोजी या संदर्भातील अधिकृत परिपत्रक जारी केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते हसन मुश्रीफ आणि छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्र्यांकडे तशी मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला यश आले असून, दादांच्या महाराष्ट्राच्या विकासातील अभूतपूर्व योगदानाचा हा मोठा सन्मान मानला जात आहे. स्व. अजितदादा पवार यांची पहिली जयंती २२ जुलै रोजी राज्यभर शासकीय स्तरावर साजरी केली जाणार आहे.

# खा. अशोकराव चव्हाण-आ. चिखलीकर एकत्रितपणे टाकळीकरांकडे!

## टाकळीकरांची मनधरणी; सर्वपक्षीय नेत्यांनी घेतली भेट
## मुकेश पाटील यांनी निवडणुकीतून माघार घ्यावी यासाठी आग्रह



**नांदेड (प्रतिनिधी)**- नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. माजी अध्यक्ष मोहन पाटील टाकळीकर यांच्या निवासस्थानी सोमवारी सर्वपक्षीय शिष्टमंडळाने भेट दिली. या भेटीत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यात आली. त्याचबरोबर मुकेश पाटील टाकळीकर यांनी निवडणुकीतून माघार घ्यावी, यासाठीही मनधरणी करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत मुकेश पाटील टाकळीकर यांनी उमेदवारी कायम ठेवत माघार घेण्यास नकार दिल्याने बिनविरोध निवडीच्या प्रयत्नांना अडथळा निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर खासदार अशोकराव चव्हाण, काँग्रेसचे खासदार रवींद्र चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार अमरनाथ राजूरकर तसेच माजी आमदार हनुमंतराव पाटील यांच्यासह सर्वपक्षीय शिष्टमंडळाने मोहन पाटील टाकळीकर यांची भेट घेतली.

भेटीदरम्यान ज्येष्ठ नेते मोहन पाटील टाकळीकर यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यात आली. तसेच जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी, या दृष्टीने मुकेश पाटील टाकळीकर यांनी उमेदवारी मागे घ्यावी, यासाठी शिष्टमंडळाने सकारात्मक चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, या भेटीनंतर मुकेश पाटील टाकळीकर यांची भूमिका काय राहणार आणि ते उमेदवारी कायम ठेवणार की माघार घेणार, याकडे जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# डिजीटल पोलिसिंगमध्ये नांदेड जिल्हा महाराष्ट्रात अव्वल

## सीसीटीएनएस मूल्यांकनात नांदेड जिल्हा पोलिसांचा डंका

**नांदेड (प्रतिनिधी)**- माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून नांदेड जिल्हा पोलीस दलाने आणखी एक उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सीसीटीएनएस (Crime and Criminal Tracking Network Systems) प्रणालीच्या एप्रिल २०२६ च्या मासिक मूल्यांकनात नांदेड जिल्हा पोलिसांनी राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी या विभागाचे कौतुक केले.

एप्रिल २०२६ च्या मूल्यांकनात विविध निकषांवर झालेल्या गुणांकनात नांदेड जिल्ह्याने २०१ पैकी २०१ गुण मिळवून राज्यात पहिला क्रमांक मिळवला आहे.

नांदेड जिल्ह्यातील ३६ पोलीस ठाण्यांच्या स्तरावर गुन्हे व पोलीस कामकाजाशी संबंधित सर्व माहिती वेळेत, अचूक व परिपूर्ण स्वरूपात नोंदवण्यात आली. यामध्ये खालील १८ प्रकारच्या नोंदींचा समावेश आहे.

**प्रथम खबर** - एफआयआर नोंदणी, घटनास्थळ पंचनामे, आरोपी अटक, मुद्देमाल जप्ती, दोषारोपपत्र - Charge Sheet, न्यायालयीन निकाल, बेपत्ता व्यक्ती, अनोळखी मृतदेह, अदखलपात्र खबर, हरवलेली/बेवारस मालमत्ता, प्रतिबंधक कारवाई आदी.

याशिवाय दैनंदिन कामकाजात सीसीटीएनएससोबतच ITSSO, ICIS, Cri-MAC आणि Citizen Portal वरील e-Complaint प्रणालीचा प्रभावीपणे वापर करण्यात आला. त्यामुळे जिल्ह्यातील पोलीस कामकाजात अधिक पारदर्शकता, गती आणि परिणामकारकता आली आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. नोडल अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील आणि सीसीटीएनएस टीममधील सहायक पोलीस निरीक्षक सुमित बासंबेकर, पोलीस हवालदार समीरखान मुनीरखान पठाण आणि पोलीस कॉन्स्टेबल माधव येळवाड यांच्या अथक परिश्रमामुळे हे यश मिळाले आहे. या कामगिरीमुळे नांदेड जिल्हा पोलिसांच्या कार्यक्षमतेचा राज्यभर गौरव होत आहे.

# पालकमंत्री अतुल सावे यांचा नांदेड दौरा

**नांदेड (प्रतिनिधी)**- राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे दि. १६ जुलै रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

दि. १६ जुलै २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून वाहनाने दुपारी ४ वा. शासकीय विश्रामगृह लातूर येथे आगमन व राखीव. सोईनुसार लातूर शासकीय विश्रामगृह येथून नांदेडकडे वाहनाने प्रयाण. सोईनुसार नांदेड शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव.

# केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आठवले नांदेडमध्ये




**नांदेड (प्रतिनिधी)**- केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले हे नांदेड दौऱ्यावर येत आहेत.

गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ रोजी सकाळी ८.१० वा. हैद्राबादहून नांदेड विमानतळ येथे आगमन. सकाळी ८.२५ वा. वाहनाने शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे आगमन. सकाळी ९.४५ वा. समाज कल्याण अधिकारी यांच्यासमवेत बैठकीस उपस्थिती. स्थळ: शासकीय विश्रामगृह, नांदेड, सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे पत्रकार परिषदेस उपस्थिती. सकाळी ११ वाजता वाहनाने वसमत जि. हिंगोलीकडे प्रयाण करतील.

# राज्यातील शेतकऱ्यांचे ४८ हजार कोटींचे वीज बिल माफ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा



**मुंबई (प्रतिनिधी)**- राज्यातील शेतकऱ्यांचे दोन लाखापर्यंतच्या कर्जमाफीचा निर्णय घेतल्यानंतर बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मोठी घोषणा केली. राज्यातील शेतकऱ्यांची तब्बल ४८ हजार कोटी रुपयांची थकीत वीज बिलं पूर्णपणे माफ करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.

शेतकऱ्यांची पाटी पूर्णपणे कोरी झाली पाहिजे आणि त्याच कोऱ्या पाटीवर आपल्याला महाराष्ट्राचा नवा इतिहास लिहिता आला पाहिजे, याच एका ध्येयाने आम्ही हा धाडसी निर्णय घेतला आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.

शेतकरी कर्जमाफीचा निर्णय घेतल्याबद्दल भाजपच्या प्रदेश समितीच्यावतीने मुख्यमंत्री फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, कर्जमाफी आणि थकीत बिलांच्या मुद्द्यावर मी नेहमीच राज्याच्या आर्थिक शिस्तीबद्दल स्पष्टपणे बोललो आहे. मात्र, आमच्या महायुतीतील काही सहकारी मंडळींनी जेव्हा माझ्याशी यावर सविस्तर चर्चा केली, तेव्हा आम्ही शेतकऱ्यांच्या हितासाठी सरसकट कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतला.

पुढे बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, जर आम्हाला केवळ आणि केवळ राजकारणच करायचे असते, तर २०२९ च्या विधानसभा निवडणुकीच्या शेवटी आम्ही कर्जमाफीचा विचार केला असता. परंतु, आम्ही शेतकऱ्यांच्या हिताच्या आड कधीही राजकारण आणणार नाही. राजकारण आम्ही करूच, ते तर करावंच लागेल; पण बळीराजाच्या जीवावर करणार नाही, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

विरोधकांवर थेट हल्ला करताना मुख्यमंत्र्यांनी म्हटले की, अनेक विरोधकांना वाटत होतं की शेतकऱ्यांच्या थकीत बिलांच्या आणि कर्जमाफीच्या मुद्द्यावर त्यांचं राजकीय दुकान नेहमीच चालू राहील. पण ते बहुधा विसरले की, हे 'देवाभाऊंचं' सरकार आहे! आम्ही जे बोलतो, ते करून दाखवतो, असा घणाघात त्यांनी केला.

# पोलिसांचे मध्यरात्री कोम्बिंग ऑपरेशन; ४१ सराईत गुन्हेगारांची झाडाझडती

## तडीपार, मकोका गुन्हेगारांवर वचक; ४ तासांत ५४ जणांना वॉरंट, समन्स बजावले

**नांदेड (प्रतिनिधी)**- जिल्ह्यातील चोरी, दरोडे आणि शरीराविरुद्धचे गुन्हे रोखण्यासाठी तसेच सराईत गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी नांदेड पोलीस दलाने मध्यरात्री जिल्ह्यात एकाच वेळी 'कोम्बिंग ऑपरेशन' राबवले. यात तडीपार, हद्दपार आणि मकोका कायद्यातील ४१ गुन्हेगारांची झाडाझडती घेण्यात आली.

दि. १४ जुलै रोजी रात्री ११ वाजल्यापासून ते १५ जुलै पहाटे ३ वाजेपर्यंत एकूण ४ तास अत्यंत गोपनीयतेने ही धडक कारवाई करण्यात आली. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार ही मोहीम राबवण्यात आली.


या दरम्यान जिल्ह्यातील मालमत्तेविरुद्ध व शरीराविरुद्ध गुन्हे करणारे, अवैध शस्त्र बाळगणारे, तडीपार/हद्दपार आरोपी, हिस्ट्रीशीटर आणि फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांची कसून तपासणी करण्यात आली.

पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, ४ तासांच्या या कारवाईत ४१ सराईत गुन्हेगारांची तपासणी, १ तडीपारीसाठी प्रस्तावित गुन्हेगाराची तपासणी, मकोका कायद्याखाली सुटलेले ३७ गुन्हेगार चेक केले. मालमत्ता व शरीराविरुद्धचे ९४ सराईत गुन्हेगारांची तपासणी, आर्म्स ॲक्ट कलम ३/२५, ४/२५ अन्वये १ गुन्हा दाखल, ५४ जणांना वॉरंट आणि समन्स बजावले.

या मोहिमेत अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे रामेश्वर व्यंजने यांच्यासह आदी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले, ओमकांत चिंचोलकर, अजित कुंभार, संतोष तांबे, राजेश पुरी, रामदास शेंडगे, संजय शिंदे, महेश माळी, रामेश्वर खनाळ आदी अधिकारी व अंमलदार, दुय्यम अधिकारी आणि आरसीपीचे जवान सहभागी झाले होते.

अचानक राबवलेल्या या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारी वर्तुळात खळबळ उडाली आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अशा प्रकारची धडक कारवाई यापुढेही सुरूच राहील, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

गेल्या दीड महिन्यात जिल्ह्यात खुनाच्या १० घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे जुन्या गुन्हेगारांसोबतच नव्या दमाच्या गुन्हेगारांवरही कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.



# वाघ्या मुरलीच्या वेशात बीएलओ पतंगे यांची जनजागृती; ग्रामस्थांनी केले कौतुक

**नांदेड (प्रतिनिधी)**- भारत निवडणूक आयोग एसआयआर विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम अंतर्गत काकांडी, पासदगाव येथे बीएलओ जनजागृती ८६ नांदेड उत्तर मतदार संघात काकांडी जि. प. शाळेचे शिक्षक सचिन उत्तमराव पतंगे यांनी आपल्या आगळ्यावेगळ्या शैलीतून पारंपारिक वाघ्या मुरळी वेशभूषा करून मतदारांची एसआयआरसंदर्भात संपूर्ण गावात जनजागृती करून एक वेगळ्या वेगळ्या उपक्रमातून जनजागृती करत सगळ्यांचे लक्ष वेधले.




लक्षवेधी

या उपक्रमाला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपजिल्हाधिकारी तथा मतदान नोंदणी अधिकारी हनुमंत कोळेकर, गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे, केंद्रप्रमुख विजय धोंडगे, पर्यवेक्षक पांडुरंग गंगासागरे, मुख्याध्यापक शेख मगदूम, सरपंच ललिता अन्नपूर्णे, ग्रा.प.सदस्य ज्ञानेश्वर पोटजाळे, संतोष पोटजाळे, दीपक पोटजाळे, शिल्पा सचिन पतंगे यांचे मार्गदर्शन लाभले.

बीएलओचे काम करत असताना एका आगळ्यावेगळ्या भूमिकेतून त्यांनी मतदारात जनजागृती करत असताना संपूर्ण काकांडी व पासदगाव गावकऱ्यांनी त्यांचे कौतुक केले.

# डिजीटल अरेस्टची भीती दाखवून १४ लाखांचा ऑनलाईन गंडा

## सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**- शहरातील एका ज्येष्ठ नागरिकास डिजीटल अरेस्टची भीती दाखवून सायबर गुन्हेगारांनी तब्बल १४ लाख १५ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी नांदेड सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

दि. ३० जून ते ४ जुलै २०२६ या कालावधीत पवननगर, तरोडा (खुर्द) येथील रहिवासी शिवाजी संभाजी तुंबलवाड (वय ६७) यांना काही अज्ञात व्यक्तींनी ऑनलाईन संपर्क साधला. आरोपींनी स्वतः ला पोलीस अधिकारी असल्याचे सांगून त्यांच्या नावाचा दहशतवादी कारवायांशी संबंध असल्याचा बनाव रचला. तसेच डिजीटल अरेस्ट करण्याची भीती दाखवत त्यांच्यावर मानसिक दबाव टाकला. या भीतीपोटी फिर्यादीकडून आरोपींनी विविध ऑनलाईन व्यवहारांद्वारे एकूण १४ लाख १५ हजार रुपये आपल्या खात्यात वळते करून घेतले. फसवणुकीची बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

या प्रकरणी प्रिया, अमितकुमार चौधरी, संदीप यादव, प्रदीप जयस्वाल तसेच मोबाईल क्रमांकधारकांसह इतरांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस)-२०२३ मधील कलम ३१८(२), ३१८(४), ३१९(२), ३०८(६), ३०८(७), ३ (५) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० मधील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे करत आहेत. दरम्यान, नागरिकांनी डिजिटल अरेस्टच्या नावाखाली येणारे फोन, व्हिडिओ कॉल किंवा ऑनलाईन पैशांची मागणी करणाऱ्या व्यक्तींवर विश्वास ठेवू नये, कोणतीही रक्कम हस्तांतरित करू नये आणि तत्काळ सायबर हेल्पलाइन किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# भारताची भूमिका शांतीदूताची

जग पुन्हा एकदा अशा वळणावर उभे आहे, जिथे एका चुकीच्या निर्णयाची किंमत संपूर्ण मानवजातीला मोजावी लागू शकते. मध्यपूर्वेतील वाढते तणाव, अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष, तसेच महासत्तांमधील वाढती स्पर्धा यामुळे अण्वस्त्रांच्या धोक्याची छाया पुन्हा गडद होत आहे. शीतयुद्ध संपल्यानंतर जग अधिक सुरक्षित होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती; मात्र आजची परिस्थिती त्या आशावादाला छेद देणारी आहे. १९६२ मधील क्युबा क्षेपणास्त्र संकट हे मानव इतिहासातील सर्वात धोकादायक अणु संघर्ष मानले जाते. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी आणि सोव्हिएत संघाचे नेते निकिता ख्रुश्चेव यांच्यातील तणावाने जगाला अणुयुद्धाच्या उंबरठ्यावर आणून ठेवले होते. परंतु संयम, संवाद आणि मुत्सद्देगिरी यांच्या बळावर तो संघर्ष टळला. त्या काळात शांततेसाठी तत्त्वज्ञ बर्ट्रांड रसेल यांच्यासारख्या विचारवंतांनी आणि पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी म हत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. आज मात्र अशा जागतिक नेतृत्वाचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. सध्याच्या संघर्षाचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे आहे. अमेरिका, इस्रायल, इराण, रशिया आणि चीन या सर्व देशांचे परस्परविरोधी हितसंबंध एकाच वेळी सक्रिय आहेत. त्यामुळे कोणत्याही एका प्रादेशिक संघर्षाचे जागतिक युद्धात रूपांतर होण्याची भीती नाकारता येत नाही. विशेषतः अण्वस्त्रधारी राष्ट्रे थेट किंवा अप्रत्यक्षपणे या संघर्षांमध्ये गुंतल्याने धोका अधिक गंभीर झाला आहे. आजच्या जगात शस्त्रास्त्रांच्या स्पर्धेला पुन्हा वेग आला आहे. अत्याधुनिक क्षेपणास्त्रे, अण्वस्त्रे, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित युद्धतंत्र आणि अंतराळातील लष्करी तयारी यामुळे जागतिक सुरक्षिततेचे समीकरण बदलत आहे. शीतयुद्धानंतर निर्माण झालेली सामरिक स्थिरता ढासळत असल्याची चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे संवादाऐवजी संघर्षाची भाषा अधिक प्रभावी होत चालली आहे. अशा परिस्थितीत भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. भारताने नेहमीच शांतता, सहअस्तित्व आणि संवादाचा पुरस्कार केला आहे. गटनिरपेक्ष चळवळीच्या माध्यमातून भारताने महासत्तांमध्ये समतोल राखण्याचा प्रयत्न केला होता. आजही भारताचे अमेरिका, रशिया, इराण आणि पश्चिम आशियातील अनेक देशांशी स्वतंत्र आणि विश्वासार्ह संबंध आहेत. हीच भारताची सर्वात मोठी ताकद आहे. भारताने कोणत्याही गटाचे अंधानुकरण करण्याऐवजी स्वतंत्र परराष्ट्र धोरण कायम ठेवले पाहिजे. राष्ट्रीय हित जोपासतानाच जागतिक शांततेसाठी मध्यस्थी करण्याची क्षमता भारताकडे आहे. अमेरिका-रशिया संवादाला चालना देणे, पश्चिम आशियात तणाव कमी करण्यासाठी राजनैतिक प्रयत्न करणे आणि संयुक्त राष्ट्रांसारख्या आंतरराष्ट्रीय मंचांवर शांततेचा ठाम पुरस्कार करणे, ही काळाची गरज आहे. भारताची सभ्यता केवळ आर्थिक किंवा लष्करी शक्तीवर आधारित नाही; तर वसुधैव कुटुंबकम् आणि विश्वशांती या मूल्यांवर उभी आहे. त्यामुळे जगात संघर्ष वाढत असताना भारताने नैतिक नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. युद्धात कोणाचाही खरा विजय होत नाही; त्यातून फक्त मानवी जीवितहानी, आर्थिक विनाश आणि पिढ्यान्‌पिढ्या टिकणारी अस्थिरता निर्माण होते. आजची परिस्थिती जगाला पुन्हा एकदा इतिहासाची आठवण करून देते. १९६२ मध्ये संयमामुळे अणुयुद्ध टळले होते. आजही त्याच संयमाची, संवादाची आणि दूरदृष्टीची गरज आहे. महासत्तांनी शक्तीप्रदर्शनाऐवजी परस्पर विश्वास आणि सहकार्याचा मार्ग स्वीकारला, तरच मानवजातीचे भविष्य सुरक्षित राहील. जगाला आज शस्त्रास्त्रांची नव्हे, तर विश्वासाची गरज आहे. भारताने आपल्या ऐतिहासिक परंपरेला साजेशी भूमिका बजावत जागतिक शांततेचा प्रभावी आवाज बनावे, हीच काळाची खरी हाक आहे.

# पंढरीच्या वारीचे महात्म्य!

महाराष्ट्रातील सर्वात मोठा लोकोत्सव म्हणजे पंढरीची वारी. दरवर्षी आषाढी - कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने देशभरातून लाखो वारकरी पंढरपुरात दाखल होतात. शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास केल्यानंतर विठुरायाचे झालेले मुखदर्शन साक्षात भगवंतप्राप्ती झाल्याचे सुख त्यांना देते. आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी । संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात, जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर! पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. अशी थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे.

पृथ्वीवरी तीर्थे असती अपार।
परी पंढरीची सर।
एकाही नाही।।

असा दाखला संत नामदेव महाराज देतात, तर

न करी आळस।
जाय पंढरीश।
अवघी सुखराशी।
तेथे आहे।।,

असे संत चोखामेळा यांनी म्हटले आहे. काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळींचे




माहेरघर असल्यानेच-

'अवघी दुमदुमली पंढरी ।
भगव्या पताका खांद्यावरी।
तुळशी वृंदावन डोक्यावरी।
भाव भुकेल्यांची ही वारी ।,' असे

म्हटले जाते. संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. तेव्हापासून चालू असलेल्या वारीमुळे पंढरपुरातील श्री विठ्ठलाची मूर्ती जागृतावस्थेत आली आहे. वारकरी राम कृष्ण हरी । असे नामसंकीर्तन सतत करत पंढरीस जातात. कलियुगात ईश्वराची कृपा संपादन करणाऱ्या एका व्यक्तीपेक्षा सर्व मिळून जेव्हा कृपा संपादनाचा प्रयत्न करतात, तेव्हा ती समष्टी साधना होते. वारीमध्ये व्यष्टीसह समष्टी साधनाही होते आणि सर्व जिवांच्या उद्धारासाठी विठ्ठलाला पंढरपुरात भूतलावर यावेच लागते. या तीर्थाचा महिमाच असा आहे. येथील भक्तांच्या तळ-मळीमुळे विठ्ठलाला पंढरपुरात यावेच लागते. पंढरपूरच्या वारीने आपल्या जीवनात भक्तीचा अखंड झरा पाझरू लागतो. भावभक्तीचे बीज प्रत्येकाच्या अंतर्मनात रुजवणारी ही वारी पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच चालू राहणार आहे. भक्तांच्या संकटसमयी धावून येण्यासाठी, आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी विठ्ठल पंढरपुरात उभा आहे. देव भावाचा भुकेला आहे, याची प्रचिती घ्यायची असल्यास पंढरपूरला जावे. शिस्तीचे दर्शन हे पालख्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. प्रत्येक दिंडीची रचना ठरलेली आहे. प्रारंभी भगवे ध्वजधारी वारकरी, मग तुळशी-वृंदावन घेतलेल्या महिला, त्यामागे टाळकरी, नंतर विणेकरी अशीच सर्व दिंड्यांची रचना असते. टाळ वाजवणाऱ्या वारकऱ्यांचा पदन्यासही लयबद्ध असतो. भले टाळकरी-वारकरी शेकडोंच्या संख्येने का असेना! वैयक्तिक जीवनातील अभिनिवेष बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी!

पांडुरंग हे सामान्यांचे दैवत आहे. पांडुरंगाचा रंग सावळा आहे आणि कृष्णही सावळाच आहे. काळा रंग हा अद्वैताचा आहे. वृंदावनातील गोपी कृष्णाला म्हणत, ''अरे कृष्णा, तू अमावास्येला अंगावर काळी घोंगडी घेऊन यमुनाकाठी कदंब वृक्षावर बसलास की, तू आम्हाला दिसतच नाहीस; कारण रात्र काळी, यमुना काळी, तू काळा आणि घोंगडीही काळीच ! अशा वेळी हे सर्व अद्वैत होऊन जाते.'' संत ज्ञानदेव म्हणतात,

'तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे ।
सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।'

म्हणजेच तो सगुण आहे आणि निर्गुणही आहे. त्याचे सगुण स्वरूप हे निर्गुणच आहे. तो स्वच्छ म्हणजे निर्मळ आहे. त्याची इंद्रिये विकाररहित आणि स्वच्छ आहेत. तो आत-बाहेर स्वच्छ आहे; म्हणून तो 'पांडुरंग' आहे. एकदा लहानपणी संत ज्ञा-नेश्वर आणि मुक्ताबाई खेळत असतांना मुक्ताबाई ज्ञानदेवांना म्हणाली, ''अरे दादा, तू या पांडुरंगाला निर्गुण म्हणतोस; परंतु हा तर सगुण स्वरूपात येथे कटीवर हात ठेवून उभा आहे.'' त्यावर संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''मुक्ता, मी तुला गुरुमुखातून सांगतो. अगं, हा निर्गुणी बुंद (बिंदु) सगुणी उतरला आहे.'' एकूणच हा निर्गुणच सगुण स्वरूपात इथे दिसत आहे. तो कष्टकरी, शेतकरी, सामान्यजन आणि अनाथ यांचा कैवारी आहे; म्हणून तो (उन्हात कष्ट करून रापलेला असा) काळ्या रंगाचा झाला आहे. असा हा सगुण-निर्गुण रूपी पांडुरंग आहे. पांडुरंग हा शैव आणि वैष्णव दोघांचाही देव आहे. याला शैव आणि वैष्णव दोघेही भजतात. शैव पंथीय पांडुरंगाला 'वीरभद्र' म्हणजेच 'विठ्ठल' म्हणतात, तर वैष्णव त्याला 'गोपाळकृष्ण' असे म्हणतात. तो विष्णु आणि शिव यांचा अवतार आहे; म्हणूनच तो 'हरिहर' आहे. असा हा पांडुरंग श्रीकृष्णाचाच अवतार आहे. काही जण 'विठ्ठल हा भगवंताचा नववा अवतार बुद्ध आहे', असेही म्हणतात. (आद्य-शंकराचार्यांच्या काळात भारतात काही नवीन धार्मिक प्रवृत्तींचा उदय होऊन जैन, बौद्ध इत्यादी धर्मपंथ उदयास आले होते. महाराष्ट्रातही बौद्ध धर्माचा प्रभाव असल्याचे दिसून येते; कारण कोकण किनारपट्टी, घाटमाथा, मराठवाडा येथील सह्याद्री पर्वताच्या रांगांमध्ये बुद्धाच्या कलाकृती असलेल्या गुंफा दिसतात.) जैन विठ्ठलाला 'तो बाविसावा तीर्थंकर नेमीनाथ आहे', असे मानतात. नेमीनाथ आणि कृष्ण हे दोघेही गोपाळच होते. ते यदुकुलोत्पन्नच होते. नेमीनाथ हाही विठ्ठलासारखा वर्णाने सावळा होता. नेमीनाथांचे शंख हे चिन्ह विठ्ठलानेही धारण केले आहे. त्यामुळे या सर्व लक्षणांवरून 'विठ्ठल हा दिगंबर नेमीनाथ असावा', असे जैनांचे मत आहे.

**-सौ. मोक्षदा घाणेकर,**
काळाचौकी, मुंबई

# सर्पसंवर्धन: उद्याच्या निसर्गासाठी आजची जबाबदारी



आज जंगलतोड, वाढते शहरीकरण, प्रदूषण आणि मानवी हस्तक्षेपामुळे सापांच्या नैसर्गिक अधिवासावर परिणाम होत आहे. अज्ञानामुळे अनेक साप मारले जातात. त्यामुळे सापांविषयी योग्य माहिती आणि जनजागृती निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे.

जागतिक सर्प दिन दरवर्षी १६ जुलै रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश सापांविषयी असलेले गैरसमज दूर करणे, त्यांचे पर्यावरणातील महत्त्व लोकांना समजावून सांगणे आणि सर्पसंवर्धनाबाबत जनजागृती करणे हा आहे.

निसर्गाच्या विशाल परिसंस्थेत प्रत्येक जीवाला एक विशिष्ट स्थान आणि भूमिका असते. साप हा त्यापैकीच एक महत्त्वाचा जीव आहे. अनेकदा भीती, अज्ञान आणि गैरसमजांमुळे सापांकडे नकारात्मक दृष्टीने पाहिले जाते; परंतु वास्तवात साप हे पर्यावरणाचे संतुलन राखणारे निसर्गाचे मौन रक्षक आहेत.

साप हे निसर्गातील अन्नसाखळीचा एक महत्त्वाचा भाग आहेत. ते स्वतः काही प्राण्यांचे भक्ष्य बनतात आणि काही लहान प्राण्यांची संख्या नियंत्रित ठेवण्याचे कार्य करतात. त्यामुळे परिसंस्थेतील विविध जीवांमध्ये संतुलन राखले जाते. सापांच्या अस्तित्वा-मुळे निसर्गातील जैविक चक्र सुरळीत चालण्यास मदत होते.

सापांची सर्वात महत्त्वाची भूमिका म्हणजे उंदीर आणि घुशी यांसारख्या प्राण्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवणे. हे प्राणी शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करतात. साप त्यांचा नैसर्गिक शत्रू असल्याम ुळे शेतीचे संरक्षण करण्यास मदत करतात. त्यामुळे साप हे शेतकऱ्यांचे अप्रत्यक्ष मित्र मानले जातात. याशिवाय काही साप बेडूक, कीटक आणि इतर लहान जीवांवर उपजीविका करतात. त्यामुळे हानिकारक जीवांची संख्या नियंत्रित राहते. निसर्गातील कोणताही जीव निरुपयोगी नसतो; प्रत्येक जीव पर्यावरणाच्या संतुलनासाठी आवश्यक असतो, हे सापांच्या भूमिकेतून स्पष्ट होते.

सापांचे संरक्षण करणे म्हणजे केवळ एका प्रजातीचे संरक्षण करणे नव्हे, तर संपूर्ण पर्यावरणाचे संतुलन जपणे होय. सापांविषयी भीती न बाळगता त्यांचे महत्त्व समजून घेणे आणि त्यांचे संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

साप वाचवा, निसर्ग वाचवा; कारण सापांचे अस्तित्व म्हणजे पर्यावरणाच्या संतुलनाचे अस्तित्व.

सापांविषयी समाजात अनेक भीती आणि गैरसमज आढळून येतात. अज्ञानामुळे अनेक लोक सापांना धोकादायक समजून त्यांना मारतात. परंतु वास्तवात साप हे निसर्गाच्या संतुलनासाठी आवश्यक असलेले महत्त्वाचे जीव आहेत. प्रत्येक साप विषारी नसतो. जगातील आणि भारतातील बहुसंख्य साप मानवासाठी निरुपद्रवी असतात. साप सामान्यतः माणसांवर हल्ला करत नाहीत; ते केवळ स्वतःचा बचाव करण्यासाठीच प्रतिक्रिया देतात. योग्य माहिती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि जनजागृतीच्या माध्यमातून सापांविषयीची अनाठायी भीती कमी करता येते. सापांना मारण्याऐवजी त्यांचे संरक्षण करणे आणि सुरक्षितपणे त्यांचे स्थलांतर करणे ही पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी आहे.

साप हे पर्यावरणातील महत्त्वाचे घटक असून त्यांचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. वाढती जंगलतोड, शहरीकरण आणि नैसर्गिक अधिवासाचा नाश यामुळे अनेक सापांच्या प्रजातींवर अस्तित्वाचे संकट निर्माण झाले आहे. रस्ते अपघात, बेकायदेशीर शिकार, अंधश्रद्धा आणि अज्ञानामुळे सापांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. याचा परिणाम केवळ सापांवरच नाही, तर संपूर्ण परिसंस्थेच्या संतुलनावर होतो. जैवविविधता टिकवण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सापांचे संरक्षण गरजेचे आहे. सापांचे संवर्धन म्हणजे निसर्गाचे संरक्षण होय. त्यामुळे सापांविषयी जागरूकता निर्माण करून त्यांचे अस्तित्व टिकवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

सापांचे अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. जंगल, गवताळ प्रदेश, शेतजमीन आणि इतर नैसर्गिक परिसर हे सापांचे निवासस्थान असून तेथेच त्यांचे जीवनचक्र सुरळीतपणे चालते.

वाढते शहरीकरण, जंगलतोड आणि अनियंत्रित विकासामुळे सापांचे अधिवास नष्ट होत आहेत. त्यामुळे अनावश्यकपणे नैसर्गिक परिसराचा ऱ्हास टाळणे गरजेचे आहे. पर्यावरणपूरक विकासाला प्राधान्य देऊन निसर्ग आणि मानवी गरजा यांचा सम तोल राखणे आवश्यक आहे. सापांच्या अधिवासाचे संरक्षण केल्यास केवळ सापांचेच नव्हे, तर संपूर्ण जैवविविधतेचे संरक्षण होण्यास मदत होते.

सर्पदंश ही एक गंभीर परिस्थिती असू शकते, परंतु योग्य माहिती आणि वेळेवर उपचार घेतल्यास धोका कमी करता येतो. सर्पदंश झाल्यास घाबरून न जाता शांत राहून त्वरित वैद्यकीय मदत घेणे आवश्यक आहे. सर्पदंशानंतर जखम कापणे, विष शोषण्याचा प्रयत्न करणे, अंधश्रद्धेवर आधारित उपचार करणे किंवा चुकीचे घरगुती उपाय करणे टाळावे. अशा पद्धतींम ुळे रुग्णाच्या जीवाला अधिक धोका निर्माण होऊ शकतो. सर्पदंश प्रतिबंध, सुरक्षित वर्तन आणि योग्य प्रथमोपचार याबाबत समाजामध्ये जनजागृती करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. योग्य माहितीमुळे सर्पदंशामुळे होणारे मृत्यू कमी करता येतात आणि मानव व साप यांच्यातील संघर्षही कमी होऊ शकतो.

सर्पमित्र हे सापांचे संरक्षण आणि मानव-साप संघर्ष कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. प्रशिक्षित सर्पमित्र सापांना कोणतीही इजा न करता सुरक्षितपणे पकडतात आणि त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात योग्य ठिकाणी सोडतात. साप घरात, शेतात किंवा मानवी वस्तीत आढळल्यास लोकांनी भीतीपोटी सापांना मारू नये, यासाठी सर्पमित्र जनजागृती करतात. ते सापांविषयी वैज्ञानिक माहिती देऊन समाजातील गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करण्याचे कार्य करतात. सर्पसंवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्पमित्रांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या कार्यामुळे सापांचे संरक्षण होण्यासोबतच मानव आणि निसर्ग यांच्यातील सहअस्तित्वाला प्रोत्साहन मिळते.

सर्पसंवर्धनामध्ये विद्यार्थी आणि समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. सापांविषयी योग्य आणि वैज्ञानिक माहिती इतरांपर्यंत पोहोचवून समाजातील भीती, गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करणे आवश्यक आहे. साप आढळल्यास त्याला मारण्याऐवजी सुरक्षित अंतर ठेवून वनविभाग किंवा प्रशिक्षित सर्पमित्रांशी संपर्क साधावा. यामुळे सापांचे संरक्षण होण्यासोबतच मानवाची सुरक्षितताही राखली जाते. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षणाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होऊन निसर्ग संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवावा. निसर्गातील प्रत्येक जीवाचे स्वतःचे महत्त्व आहे, हे समजून घेऊन सर्व जीवांप्रती संवेदनशीलता आणि जबाबदारीची भावना निर्माण करणे गरजेचे आहे. सापांचे संरक्षण आणि पर्यावरणातील संतुलन टिकवण्यासाठी काही महत्त्वपूर्ण उपाय करणे आवश्यक आहे. साप हे निसर्गातील महत्त्वाचे घटक असल्यामुळे त्यांच्या संवर्धनासाठी समाजाचा सक्रिय सहभाग गरजेचा आहे. सापांच्या संरक्षणासाठी अस्तित्वात असलेल्या वन्यजीव संरक्षण कायद्यांचे पालन करणे आवश्यक आहे. सापांची शिकार, तस्करी किंवा त्यांना इजा पोहोचवणाऱ्या कृती टाळल्या पाहिजेत.

सापांचे नैसर्गिक अधिवास असलेले जंगल, गवताळ प्रदेश, शेतजमीन आणि इतर परिसरांचे संवर्धन करणे गरजेचे आहे. अधिवास सुरक्षित राहिल्यास सापांच्या प्रजातींचे अस्तित्व टिकून राहण्यास मदत होते.

सापांविषयी योग्य माहिती देण्यासाठी जनजागृती कार्यक्रम, व्याख्याने आणि पर्यावरण शिक्षण उपक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. यामुळे समाजातील गैरसमज दूर होऊन सापांबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो. जैवविविधतेच्या संरक्षणाला प्रोत्साहन देणे आणि निसर्गातील प्रत्येक जीवाचे महत्त्व समजून घेणे ही सर्पसंवर्धनाची महत्त्वाची पायरी आहे. सापांचे संरक्षण म्हणजे पर्यावरणाचे संरक्षण होय

साप हे निसर्गाचे शत्रू नसून पर्यावरणाचे संतुलन राखणारे महत्त्वाचे जीव आहेत. सापांचे संरक्षण म्हणजे निसर्गाचे संरक्षण हे लक्षात घेऊन प्रत्येकाने सर्पसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. आज घेतलेली काळजी उद्याच्या निरोगी आणि संतुलित पर्यावरणासाठी महत्त्वाची ठरेल.

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो.नं.९७६७८३०४९८

# संघर्षातून घडलेले लोकनेतृत्त्व: संभाजीराव धुळगंडे

माणसाचे मोठेपण त्याच्या पदावरून नव्हे, तर त्याच्या विचारांवर, कर्तृत्वावर आणि सम ाजासाठी केलेल्या निःस्वार्थ कार्यावर ठरत असते. अशाच कर्तृत्ववान, अभ्यासू, प्रामाणिक आणि लोकाभिमुख व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे संभाजीराव धुळगंडे. जिल्हा परिषद नांदेडचे माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य आजही अनेकांच्या स्मरणात आहे. आज त्यांच्या वाढदिवसा-निमित्त त्यांच्या जीवनप्रवासाकडे पाहताना अभिमान, आदर आणि कृतज्ञतेची भावना मनात दाटून येते.

त्यांचा जीवनप्रवास हा संघर्ष, जिद्द, चिकाटी आणि लोकसेवेच्या अखंड ध्यासाचा प्रेरणादायी प्रवास आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून त्यांनी स्वतःच्या कर्तृत्वाच्या बळावर समाजात मानाचे स्थान निर्माण केले. आर्थिक आणि सामाजिक अडचणींनी त्यांची वाट अडवण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांनी कधीही परिस्थितीसमोर हार मानली नाही. शिक्षणालाच त्यांनी जीवन परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले आणि त्याच शिक्षणाच्या बळावर त्यांनी सामान्य कार्यकर्त्यापासून जिल्हा परिषद, नांदेडच्या अध्यक्षपदापर्यंतचा प्रेरणादायी



प्रवास घडवला.

त्यांच्या कार्यक्षमतेची, निष्ठेची आणि प्रामाणिकपणाची दखल तत्कालीन ज्येष्ठ नेते शंकरराव चव्हाण यांनी घेतली. ते संभाजीराव धुळगंडे यांना आपल्या विश्वासू सहकाऱ्यां-प्रमाणे जपायचे. त्यांच्या नेतृत्वगुणांवर आणि जनसामान्यांमधील स्वीकारार्हतेवर विश्वास ठेवूनच त्यांना जिल्हा परिषद अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारण्याची संधी मिळाली. हे पद त्यांना केवळ राजकीय समीकरणातून मिळाले नव्हते, तर त्यांच्या निष्ठावान कार्याची, प्रामाणिक स्वभावाची आणि जनतेने ठेवलेल्या विश्वासाची ती योग्य पावती होती.

जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून त्यांनी ग्रामीण विकास, शिक्षण, शेती, पाणीपुरवठा, रस्ते आणि सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत गरजांना सर्वो च्च प्राधान्य दिले. तळागाळातील लोकांच्या सम स्या जाणून घेण्यासाठी ते स्वतः गावोगावी जात असत. प्रत्येक व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकून, त्याच्या प्रश्नाचे समाधान करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे हीच त्यांच्या कार्यपद्धतीची खरी ओळख होती. गरजू, शेतकरी, मजूर, विद्यार्थी, महिला व वंचित घटक यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी सातत्याने धडपड केली. समाजातील प्रत्येक घटकाप्रती असलेली त्यांची तळमळ, संवेदनशीलता आणि कार्यतत्परता यामुळे ते केवळ लोकप्रतिनिधी राहिले नाहीत, तर जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणारे खरे लोकनेते बनले.

सन २०१५ पासून ते श्रीक्षेत्र माळेगाव ते तीर्थक्षेत्र चौंडी (जि. अहिल्यानगर) या पवित्र मार्गावर लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त निघणाऱ्या भव्य रथयात्रेचे अविरत नेतृत्व करत आहेत. ही रथयात्रा केवळ धार्मिक परंपरेचा भाग नसून, धनगर समाजाच्या अस्मितेचे, ऐतिहासिक वैभवाचे, सांस्कृतिक वारशाचे आणि सामाजिक ऐक्याचे प्रतीक बनली आहे.

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांच्या वेदना त्यांनी सदैव जवळून अनुभवल्या. म्हणूनच गेली तेवीस वर्षे ते गरजू युवक-युवतींचे सामूहिक विवाह सोहळे अत्यंत नियोजनबद्ध आणि निःस्वार्थ भावनेने आयोजित करत आहेत. या उपक्रमामुळे असंख्य कुटुंबांना आर्थिक आधार मिळाला, अनेक तरुणांच्या संसाराला शुभारंभ मिळाला आणि समाजात परस्पर सहकार्याची एक प्रेरणादायी परंपरा निर्माण झाली. त्यांच्यासाठी समाजसेवा ही केवळ जबाबदारी नसून ती एक जीवनसाधना आहे. समाजातील कोणत्याही व्यक्तीवर संकट आले की, मदतीसाठी सर्वप्रथम धावून जाणारे, दुःखात आधार देणारे आणि आनंदात सहभागी होणारे लोकनेते म्हणून त्यांनी जनमानसात एक अढळ स्थान निर्माण केले आहे. म्हणूनच आज धनगर समाजात त्यांचे नाव समाज भूषण म्हणून उच्चारले जाते. ते केवळ एका नेत्याचे नव्हे, तर समाजासाठी आयुष्य अर्पण केलेल्या एका सेवाव्रती व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक म्हणून ओळखले जातात.

कुटुंबामध्येही त्यांनी प्रेम, संस्कार, शिस्त आणि माणुसकीची मूल्ये रुजवली. प्रामाणिकपणा, कष्टाची तयारी, समाजाप्रती उत्तरदायित्व आणि माणसांवर प्रेम करण्याची शिकवण त्यांनी आपल्या कुटुंबाला दिली. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि निरंतर आनंद लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांनी केलेले लोकहिताचे कार्य, संघर्षातून घडवलेला आदर्श आणि माणुसकीचा वारसा पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. संघर्ष हा त्यांचा गुरू, प्रामाणिकपणा हा त्यांचा स्वभाव, लोकसेवा हा त्यांचा धर्म आणि जनतेचा विश्वास हीच त्यांची खरी संपत्ती. आदरणीय श्री. संभाजीराव धुळगंडे साहेब यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

**-सौ. सुनीता बाबाराव मिरटकर (धुळगंडे)**
लोहा, जि. नांदेड

# मतदारांनी वेळेत नाव नोंदणी करावी -आ. बोंढारकर

## उत्कृष्ट बीएलओंचा खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते सत्कार होणार




**नांदेड (प्रतिनिधी)–** मतदार नोंदणी प्रक्रियेतील विशेष संक्षिप्त पुनरीक्षण अभियानाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने नांदेड येथे पदाधिकारी, बुथ लेव्हल एजंट आणि कार्यकर्त्यांची मार्गदर्शन व आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीला मोठ्या संख्येने इङ तसेच शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

ही बैठक शिवसेना मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार आणि शिवसेना उपनेते, खासदार ना. हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या पुढाकाराने घेण्यात आली.

यावेळी आ. बोंढारकर यांनी उपस्थितांना डखठ अभियानाचे महत्त्व पटवून देत प्रत्येक पात्र मतदारापर्यंत पोहोचून नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन केले.

ज्या इङ ने सर्वात प्रभावीपणे अभियान राबवले त्यांना आमदार बोंढारकर यांच्यातर्फे बक्षीस देण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी केली. तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या इङंचा महाराष्ट्राचे नेते खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना आमदार बोंढारकर म्हणाले, प्रत्येक पात्र मतदाराने वेळेत डखठ नोंदणी करून घ्यावी. भविष्यात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये आणि मतदार यादीतील नाव कायम राहावे, यासाठी नागरिकांनी स्वतः पुढाकार घेणे आवश्यक आहे.

बैठकीत अभियान प्रभावीपणे राबविण्याबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्रत्येक बूथवर १०० टक्के मतदार नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले.

या बैठकीस शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, युवासेना जिल्हाप्रमुख बाळू पाटील मोरे, महिला जिल्हाप्रमुख वनमाला राठोड, गिता पुरोहित, शहरप्रमुख सुहास पाटील खराणे, तालुकाप्रमुख उद्धव पाटील शिंदे, अशोक मोरे, स्नेहा पाटील, स. दिलीपसिंह सोढी, स. अवतारसिंह पहरेदार, स. गुरमीतसिंह तमाना, बिल्लू यादव, गणेश मोरे, शंकर पिनोजी, बालाजी सुपारे, पांडुरंग येवले, बालाजी भायगावकर, नरेंद्र गायकवाड, गंगाबिशन काकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घ्यावा; विशेष अभियानास प्रारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांना मिळावा यासाठी शासनाच्या निर्देशानुसार १ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत विशेष जनजागृती व अर्ज नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील सर्व पात्र शेतकऱ्यांना या विशेष अभियानाचा लाभ घेऊन महाडीबीटी पोर्टलवर तत्काळ अर्ज नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित मंडळ कृषी अधिकारी किंवा सहायक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

शासनाच्या प्रचलित तरतुदीनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अल्प व अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना २५ टक्के, इतर शेतकऱ्यांना ३० टक्के अनुदान मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेंतर्गत देण्यात येईल. तसेच उर्वरित १० किंवा १५ टक्के अनुदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना/बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना अंतर्गत अदा करण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांना एकूण ९० टक्के पर्यंत अनुदान उपलब्ध होणार आहे.

## सोशल माध्यमावर दादागिरीचे फोटो व्हायरल करणे आले अंगलट; युवकाला ताब्यात घेऊन पिस्टल (सदृश्य) आणि तलवार केली जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** सोशल माध्यमाचा वापर हा चांगल्या कामासाठी व्हावा हा उद्देश असतानाही काही गुंड प्रवृत्तीचे तरुण या माध्यमांचा वापर आपल्या दहशतीसाठी करत आहेत. सोशल माध्यमावर हातात तलवार, पिस्टल किंवा अरेरावीची भाषा दाखवत आपण समाजापेक्षा काही वेगळे आहोत असा प्रचार करणाऱ्या एका तरुणाला नांदेड ग्रामीण पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून एक गावठी पिस्तूलसदृश्य लाइटर आणि तलवार जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध शस्त्रधारकांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाला गुप्त माहिती मिळाली की, हनमंत उर्फ अविनाश किशन गजले (वय २३, रा. निळा, ता. लोहा, जि. नांदेड) हा आपल्या इन्स्टाग्राम खात्यावर हातात शस्त्र घेऊन फोटो प्रसारित करून दहशत निर्माण करत आहे.

माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलिसांनी पंचासमक्ष संशयिताची अंगझडती घेतली. झडतीदरम्यान त्याच्याकडून गावठी कट्टासदृश लायटर तसेच सुमारे ३५ इंच लांबीची धारदार तलवार जप्त करण्यात आली.

या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८७०/२०२६ अन्वये भारतीय हत्यार कायद्यातील संबंधित कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महात्मा फुले हायस्कूलच्या एनसीसी एअर विंगची देदीप्यमान कामगिरी

# मेन ड्रिलमध्ये प्रथम क्रमांक; दत्ता बारसे यांना फर्स्ट ऑफिसर पदोन्नती



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील बाबानगरामील महात्मा फुले हायस्कूल ३ एमएच आयआर एसक्यएन एनसीसी, पुणे अंतर्गत कार्यरत एनसीसी एअर विंग विभागाने सी.ए.टी.सी.-७१६ (Combined Annual Training Camp-2026) मध्ये दुहेरी यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. दि. ५ ते १४ जुलै या कालावधीत आयोजित या शिबिरात महाराष्ट्रातील ११ शाळांच्या एनसीसी पथकांनी सहभाग घेतला होता.

शिबिरातील अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या मेन ड्रिल स्पर्धेत महात्मा फुले हायस्कूलच्या कॅडेट्सनी उत्कृष्ट शिस्त, अचूक संचलन आणि प्रभावी समन्वयाचे दर्शन घडवत प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशामुळे शाळेसह नांदेड जिल्हा आणि ३ एमएच आयआर एसक्यएन एनसीसी, पुणे युनिटच्या नावलौकिकात भर पडली आहे.

या यशामागे एनसीसी एअर विंगचे ए.एन.ओ. दत्ता बारसे यांचे नियोजनबद्ध प्रशिक्षण, कठोर परिश्रम आणि विद्यार्थ्यांवर केलेले सातत्यपूर्ण मार्गदर्शन हे प्रमुख कारण ठरले. गेल्या बारा वर्षांपासून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्त्व, देशभक्ती आणि सेवाभावाची मूल्ये रुजवत अनेक कॅडेट्सना राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवून दिले आहे.

या शिबिरादरम्यान त्यांच्या उत्कृष्ट सेवाकार्याची दखल घेत सेकंड ऑफिसर पदावरून 'फर्स्ट ऑफिसर' या उच्च पदावर त्यांची पदोन्नती जाहीर करण्यात आली. ३ एमएच आयआर एसक्यएन एनसीसी, पुणेचे कमांडिंग ऑफिसर विंग कमांडर एस. एस. मराठे आणि विंग कमांडर अर्पण चंदा यांच्या हस्ते त्यांना पदोन्नतीचे चिन्ह प्रदान करण्यात आले.

फर्स्ट ऑफिसर दत्ता बारसे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक कॅडेट्सनी विविध प्रशिक्षण शिबिरे, सामाजिक उपक्रम आणि राष्ट्रीय स्तरावरील एनसीसी स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, नेतृत्त्वगुणांच्या संवर्धनासाठी आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे मानले जाते.

महात्मा फुले हायस्कूलच्या एनसीसी एअर विंगची ही दुहेरी कामगिरी संपूर्ण नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली असून, भविष्यातही या विभागाकडून अशीच उज्ज्वल कामगिरी घडत राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## एसटी महामंडळच्या वर्धापन दिनानिमित्त खा. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त नांदेड विभागीय कार्यालयात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याअंतर्गत विभागीय कार्यालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमाचा शुभारंभ खा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला. यावेळी त्यांनी पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे आवाहन केले. वृक्षारोपण ही काळाची गरज असून भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवाई जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. सदर कार्यक्रम विभाग नियंत्रक अभय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरातील आगार व विभागीय कार्यालयांमध्ये वृक्षारोपणासह विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून नांदेड विभागीय कार्यालयात हा उपक्रम उत्साहात पार पडला.

या प्रसंगी नांदेड शहरातील वर्कशॉप भागात असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विभागीय कार्यालय परिसरात खा. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमात विभागीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय बौद्ध महासभेच्या लोहा तालुकाध्यक्षपदी धोंडीबा यानभुरे

**लोहा (प्रतिनिधी)–** भारतीय बौद्ध महासभेच्या लोहा तालुकाध्यक्षपदी धोंडीबा यानभुरे, सरचिटणीस सुधीर महाबळे तर कोषाध्यक्षपदी बापुसाहेब कापुरे यांची निवड करण्यात आली.

क्रांतीसूर्य बुद्ध विहार लोहा या ठिकाणी जिल्हाधक्ष हौसाजी वारघडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा सरचिटणीस रत्नाकर महाबळे, कोषाध्यक्ष बी. डी. कांबळे, संस्कार उपाध्यक्ष पी. एम. वाघमारे, संस्कार सचिव चंद्रकांत चौंदते, जिल्हा संघटक के. के. वाघमारे उपस्थित होते. प्रथम मान्यवरांच्या हस्ते भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पपूजा करण्यात आली. त्रिसरण पंचशील घेतल्यानंतर रत्नाकर महाबळे यांनी जुनी तालुका कार्यकारिणी बरखास्त करण्यात आल्याचे जाहीर केले.

## जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती समितीसाठी ३० जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय समाजात रुजलेल्या काही अनिष्ट, अघोरी, अमानुष संस्कारातून रुजलेल्या अनेक प्रकारच्या गैरसमजुतीमुळे समाजाचे अतोनात नुकसान होत असल्याचे दिसून येत आहे. लाखो माणसांचा जीव वाचविण्यासाठी त्यांचे होणारे शोषण व छळ थांबविण्यासाठी व समाजाचे मानसिक स्वास्थ सुधारण्यासाठी शासनाने जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमजबजावणीसाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधकिारी, नांदेड यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

यामध्ये अशासकीय ७ सदस्य (त्यात किमान २ महिला) व जिल्हा समन्वयक यांची नियुक्ती राज्यस्तरीय पीआयएमसी अध्यक्ष व सहअध्यक्ष यांच्या मान्यतेने व आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या सहमतीने करण्यात यावी, असे निर्देश आहेत.

तरी इच्छुक नागरिकांकडून एकूण ७ अशासकीय सदस्यां-करिता (त्यात किमान २ महिला) व १ जिल्हा समन्वयक यांचेकरिता अर्ज मागविण्यात येत असून, सहायक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड या कार्यालयात शासकीय कामकाज वेळेत आपला अर्ज सादर करावा, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

# किनवटच्या डीवायएसपींनी जप्त केला ३.५२ लाखांचा सुगंधित तंबाखू



**किनवट (प्रतिनिधी)–** शहराच्या माहूर रस्त्यावरील एका दुकानात पोलीस उपअधीक्षकांच्या पथकाने बुधवार, दि. १५ जुलै रोजी छापा टाकून सुमारे ३.५२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.आठवडाभरातील या दुसऱ्या मोठ्या कारवाईमुळे अवैध तंबाखू आणि गुटखा विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

माहूर रस्त्यावरील कलावती गार्डन मंगल कार्यालयाला लागून असलेल्या एका शेडमध्ये मोठ्या प्रमाणावर सुगंधित तंबाखूचा साठा लपवून ठेवण्यात आल्याची गोपनीय माहिती किनवटचे उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांना मिळाली. या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस उपअधीक्षक कदम व त्यांच्या पथकाने सदर ठिकाणी धाड टाकली. या कारवाईदरम्यान शेडमध्ये प्लास्टिकच्या दोन मोठ्या पिशव्या तसेच २३ छोटे प्लास्टिकची २३ छोटी पोती आढळून आली. त्या पोत्यांची झडती घेतली असता, त्यात प्रतिबंधित असलेल्या पिवळ्या रंगाच्या सुगंधित तंबाखूचे अडीचशे ग्रॅम वजनाचे एकूण १ हजार ४१० पुडे मिळून आले. बाजारभावाप्रमाणे या एका पुड्याची किंमत २५० रुपये असून, जप्त करण्यात आलेल्या एकूण साठ्याची किंमत ३ लाख ५२ हजार पाचशे रुपये आहे. पोलिसांनी हा सर्व मुद्देमाल जप्त केला असून पुढील कारवाई सुरू होती.

सध्या किनवट पोलीस उपअधीक्षक कार्यालयाकडून शहरातील व परिसरातील अवैध धंद्यांवर सातत्याने धाडी टाकून धडक कारवाई केली जात आहे. आठवडाभरातील ही दुसरी मोठी कारवाई आहे.

## जिल्हा समन्वय समितीच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा समन्वय समितीच्यावतीने जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटना, आस शिक्षक संघटना, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, महाराष्ट्र शिक्षक समिती, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना, महाराष्ट्र राज्य शिक्षक संघ, महाराष्ट्र कास्ट्राईब शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटना आदी शिक्षक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## डॉ. शंकरराव चव्हाण जयंतीनिमित्त युवक काँग्रेसच्या महारक्तदान शिबिराला प्रतिसाद




**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाड्याचे भगीरथ, जलक्रांतीचे प्रणेते तथा माजी केंद्रीय गृहमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त नांदेड जिल्हा व शहर युवक काँग्रेसच्या वतीने घेण्यात आलेल्या महारक्तदान शिबिराला रक्तदात्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

शहराच्या नवीन मोंढा येथील काँग्रेसच्या जिल्हा कार्यालयात रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिराला नांदेड लोकसभेचे खासदार तथा नांदेड दक्षिण जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष प्रा. रवींद्र वसंतराव चव्हाण, माजी आ. हनुमंतराव पाटील बेटमोगरेकर, नांदेड उत्तरचे जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, महाराष्ट्र प्रदेश महासचिव रेखा चव्हाण, माजी कार्याध्यक्ष महेश देशमुख, माजी सभापती जि. प. संजयअप्पा बेळगे, सिडको ब्लॉक अध्यक्ष महिला ज्योती कदम, शिवाजीनगर ब्लॉक अध्यक्ष रमेश चित्ते, ओबीसी ब्लॉक अध्यक्ष प्रवीण कानगुले, सुरज दुधाटकर, तसेच युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष (शहर) शंकर बाजीराव शिंदे, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष (दक्षिण) अतुल पेदेवाड, एनएसयूआय शहराध्यक्ष अक्षय नळगे, युवक काँग्रेस दक्षिण विधानसभा अध्यक्ष अंबादास रातोळे, उत्तर तालुकाध्यक्ष गणेश कोकाटे, देगलूर विधानसभा अध्यक्ष उत्कर्ष सोंडारे, प्रसेंजित वाघमारे, सोनू पाटील, गोविंद पाटील, श्रीकांत पाटील जोगदंड, गंगाधर आडेराव, कलीम शेख, प्रथमेश गिरी, लक्ष्मण राऊत, शिवम पाटील, विवेक चिवडे, सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याशिवाय जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे सर्व विभागांचे अध्यक्ष, विविध सेलचे पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी, नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सध्या नांदेड जिल्ह्यात रक्ताचा तुटवडा जाणवत असल्याने प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही महारक्तदान शिबीर युवक काँग्रेसच्यावतीने घेण्यात आले. या रक्तदान शिबिराला युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी रक्तदान करून उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे उद्या नांदेड दौऱ्यावर

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) चे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश अध्यक्ष शशिकांत शिंदे हे पक्ष संघटनेसाठी मराठवाड्याच्या दौऱ्यावर असून ते नांदेड जिल्ह्यामध्ये दि. १६ व १७ जुलै रोजी दौऱ्यावर आहेत. त्यांच्या उपस्थितीत नांदेड येथे महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन दि. १७ जुलै रोजी करण्यात आले आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे जिल्हाध्यक्ष भगवान पाटील आलेगावकर यांनी दिली.



प्रदेश अध्यक्ष शशिकांत शिंदे हे दि. १६ जुलै रोजी दुपारी ३:३० वाजता हिंगोली येथून माहूर येथे त्यांचे आगमन होणार आहे. स्वर्गीय आमदार प्रदीप नाईक यांच्या दहेली तांडा येथील निवासस्थानी ६.१५ मिनिटाला भेट देतील. त्यानंतर कार्यकर्ता व पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी ७.३० वाजता शासकीय विश्रामगृह माहूर येथे बैठक घेणार आहेत. तसेच रात्री माहूर येथे त्यांचा मुक्काम असणार आहे. दि.१७ जुलै रोजी सकाळी ७:३० वाजता माहूर येथील साडेतीन शक्तीपिठांपैकी एक असलेल्या श्री रेणुका मातेचे दर्शन घेणार आहेत. त्यानंतर माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसांनी यांच्या निवासस्थानी सकाळी ८.३० वाजता भेट देणार आहेत. माहूर येथून नांदेडकडे ते प्रयाण करतील. त्यांचे नांदेड येथे आगमन होऊन सकाळी ११ ते १ या वेळेत नांदेड शहर व नांदेड ग्रामीण जिल्हा कार्यकर्ता व पदाधिकरी यांची बैठक शासकीय विश्रामगृह नांदेड येथे पार पडणार आहे. दुपारी १ वाजता ते नांदेड येथून लातूरकडे ते प्रयाण करणार आहेत.

नांदेड येथील आयोजित बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर यांनी केले आहे.

# बळीरामपूर येथील संतगुरु रविदास महाराज तीर्थक्षेत्र परिसरातील जागा सामाजिक उपक्रमासाठी उपलब्ध

## तीर्थक्षेत्राचे संस्थापक अध्यक्ष वामनराव विष्णुपुरीकर यांची माहिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** बळीरामपूर येथे चर्मकार समाजातील वंचित, दुर्लक्षित व उपेक्षित समाजबांधवांसाठी एक महत्त्वपूर्ण सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. संतगुरु रविदास महाराज तीर्थक्षेत्र (वर्ग 'ब') च्या माध्यमातून विविध सामाजिक कार्यक्रमांसाठी सर्व मूलभूत सुविधांनी सुसज्ज अशी जागा समाजबांधवांना पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे रविदास महाराज तीर्थक्षेत्राचे संस्थापक अध्यक्ष वामनराव मे. विष्णुपुरीकर यांनी कळविले आहे.

बळीरामपूर येथील रविदास महाराज तीर्थक्षेत्र येथे सुमारे आठ गुंठे क्षेत्रफळ असलेल्या या परिसरात विवाह सोहळे, साखरपुडा, वाढदिवस, हळदी-कुंकू समारंभ, समाजप्रबोधनपर कार्यक्रम, चर्चासत्रे तसेच विविध सामाजिक उपक्रम आयोजित करता येणार आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना या ठिकाणी कार्यक्रम आयोजित करता यावेत, या सामाजिक उद्देशातून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

या सुविधेचा चर्मकार समाजातील सर्व समाज-बांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संतगुरु रविदास महाराज तीर्थक्षेत्राचे संस्थापक अध्यक्ष वामनराव मे. विष्णुपुरीकर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांनी मो. ९८२२४२५३८४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचेही आवाहन केले आहे.

समाजातील एकोपा, सामाजिक बांधिलकी आणि सामूहिक विकासाला चालना देणारा हा उपक्रम समाजासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना समाज-बांधवांकडून व्यक्त केली जात असून, बळीरामपूर येथील संतश्री रविदास महाराज तीर्थक्षेत्राचे संस्थापक अध्यक्ष वामनराव मे. विष्णुपुरीकर यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

फॅशन | संसार | सौंदर्य

सखी



# घरच्या घरी करा आयुर्वेदिक हेअर स्पा; केसांना मिळेल पार्लरसारखी चमक

**आजकाल केस गळणे, कोरडेपणा, फ्रीझी केस, कोंडा आणि केस तुटण्याच्या समस्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. अशा वेळी अनेकजणी पार्लरमध्ये जाऊन हेअर स्पा करून घेतात. मात्र, सलूनमधील अनेक उपचारांमध्ये रासायनिक घटकांचा वापर होत असल्याने त्याचा परिणाम काही काळापुरताच मर्यादित राहतो. याउलट आयुर्वेदिक हेअर स्पा नैसर्गिक घटकांच्या साहाय्याने केसांना आतून पोषण देतो आणि त्यांना दीर्घकाळ मजबूत व निरोगी ठेवण्यास मदत करतो. आयुर्वेद तज्ज्ञांच्या मते, योग्य आयुर्वेदिक हेअर पॅक नियमित वापरल्यास केसांच्या मुळांना आवश्यक पोषण मिळते, टाळूचे आरोग्य सुधारते आणि केस मऊ, चमकदार तसेच फ्रीझ-फ्री राहण्यास मदत होते.**

## आयुर्वेदिक हेअर स्पा अधिक प्रभावी का?

**पार्लरमध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक उत्पादनांमध्ये सिलिकॉनचा वापर केला जातो. त्यामुळे केस काही काळासाठी मऊ, चमकदार आणि व्यवस्थित दिसतात; मात्र प्रत्येक धुण्यानंतर ही चमक कमी होत जाते. आयुर्वेदिक हेअर स्पा मात्र समस्येच्या मूळ कारणावर काम करतो. त्यामध्ये वापरले जाणारे आवळा, भृंगराज, मेथी, कोरफड, कडुनिंब, जास्वंद यांसारखे नैसर्गिक घटक अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजांनी समृद्ध असतात. त्यामुळे केसांना नैसर्गिक आर्द्रता, पोषण आणि मजबुती मिळते.**

- » केसगळतीसाठी आवळा-भृंगराज हेअर स्पा : केस मोठ्या प्रमाणात गळत असतील तर आवळा आणि भृंगराज यांचा पॅक उपयुक्त ठरू शकतो. यासाठी २ टेबलस्पून आवळा पावडर, २ टेबलस्पून भृंगराज पावडर, आवश्यकतेनुसार दही असे साहित्य घ्या. सर्व साहित्य एकत्र करून घट्ट पेस्ट तयार करा. ही पेस्ट केसांच्या मुळांपासून संपूर्ण केसांवर लावा. ३० ते ४० मिनिटांनी सौम्य शॅम्पूने केस धुवा. या स्पामुळे केसांच्या मुळांना बळकटी मिळते. केसगळती कमी होण्यास मदत होते. टाळूतील खाज, बुरशी आणि कोंड्याचा त्रास कमी होतो. केसांची नैसर्गिक चमक वाढते.
- » कोरड्या केसांसाठी जास्वंद आणि कोरफड : रूक्ष आणि निस्तेज केसांसाठी जास्वंद आणि कोरफड हा स्पा फायदेशीर ठरतो. यात ६ ते ८ जास्वंदाची फुले, २ जास्वंदाची पाने, ३ टेबलस्पून कोरफडीचा गर असे साहित्य घ्या. कोरफडीऐवजी पिकलेल्या केळ्याचाही वापर करू शकता. या स्पामुळे केसांना नैसर्गिक कंडिशनिंग मिळते. टाळूला खोलवर आर्द्रता मिळते. केस अधिक मऊ आणि चमकदार होतात.
- » तेलकट टाळूसाठी मेथी आणि दह्याचा पॅक : टाळू तेलकट असेल किंवा खाज, बुरशीचा त्रास होत असेल तर हा पॅक उपयुक्त ठरतो. भिजवलेली मेथी, दही असे साहित्य घ्या. मेथी रात्रभर भिजवून दुसऱ्या दिवशी बारीक वाटा. त्यामध्ये दही मिसळून तयार झालेली पेस्ट ३० मिनिटे केसांना लावा आणि नंतर थंड पाण्याने धुवा. या स्पामुळे टाळूतील बुरशी कमी होण्यास मदत होते. केसांच्या मुळांना प्रथिने मिळतात. केसगळती कमी होते. केसांना योग्य आर्द्रता मिळते.
- » खराब आणि कोरड्या केसांसाठी केळे व मध : पिकलेले केळे, २ टेबलस्पून मध, २ टेबलस्पून नारळाचे दूध असे साहित्य घ्या. सर्व साहित्य एकजीव करून गुळगुळीत पेस्ट तयार करा. ती केसांच्या मुळांपासून टोकापर्यंत लावा. ३० मिनिटांनंतर केस स्वच्छ धुवा. या स्पामुळे केसांचे डीप कंडिशनिंग होते. कोरडेपणा कमी होतो. केस अधिक मऊ, रेशमी आणि व्यवस्थित राहतात.
- » कोंडा आणि तेलकट टाळूसाठी कडुनिंब व मुलतानी माती : ३ टेबलस्पून मुलतानी माती, २ टेबलस्पून कडुनिंब पावडर, गुलाबपाणी किंवा साधे पाणी असे साहित्य घ्या. सर्व साहित्य एकत्र करून पेस्ट तयार करा. ती टाळूवर २० ते २५ मिनिटे लावून ठेवा आणि नंतर स्वच्छ धुवा. या स्पामुळे टाळूतील अतिरिक्त तेल कमी होते. कोंडा कमी होण्यास मदत होते. टाळूला थंडावा मिळतो. जंतू आणि बुरशीच्या वाढीस प्रतिबंध होतो.

### हे लक्षात ठेवा...

- » आयुर्वेदिक हेअर पॅक आठवड्यातून एकदा वापरणे पुरेसे असते.
- » पॅक साधारण ३० मिनिटे केसांवर ठेवावा.
- » आपल्या केसांचा प्रकार आणि टाळूची समस्या लक्षात घेऊन योग्य पॅक निवडावा.
- » संतुलित आहार, पुरेसे पाणी आणि चांगली झोप यांचाही केसांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होतो.
- » सायनस किंवा थंडीचा त्रास असल्यास अतिथंड गुणधर्म असलेल्या घटकांचा वापर करताना तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.
- » नियमित आयुर्वेदिक हेअर स्पामुळे केसांचा फ्रीझीपणा कमी होतो, कोंड्यापासून आराम मिळतो, केस अधिक मजबूत आणि चमकदार होतात तसेच दीर्घकाळ निरोगी राहण्यास मदत मिळते.

### स्पाचे फायदे

- » टाळूला नैसर्गिक पोषण मिळते.
- » केसांचा कोरडेपणा आणि फ्रीझीपणा कमी होतो.
- » केस तुटण्याचे प्रमाण घटते.
- » केस अधिक मऊ आणि रेशमी होतात.
- » केसांच्या मुळांना मजबुती मिळते.
- » टाळूमधील रक्ताभिसरण सुधारते.
- » सल्फेट, पॅराबेन, सिलिकॉन किंवा कृत्रिम सुगंध नसल्यामुळे केसांवर रासायनिक दुष्परिणाम होत नाहीत.



# ‘हुंडा घेणे पाप आहे’ : 8 मोठ्या केसेस अन् आकड्यांतून जाणा हुंडा प्रथेचे सत्य

**भारतात हुंडा प्रथा आजही पूर्णपणे संपलेली नाही. आधुनिकतेच्या गप्पा रंगत असल्या, तरी हुंड्याची मागणी अनेक कुटुंबांमध्ये सुरूच आहे. या प्रथेमुळे महिलांचा होणारा मानसिक व शारीरिक छळ, आत्महत्या आणि संशयास्पद मृत्यूच्या घटनांनी देशाला वारंवार हादरे दिले आहेत. अलीकडेच मध्य प्रदेशातील ट्विशा शर्मा, नोएडातील दीपिका नागर, कर्नाटकातील ऐश्वर्या प्रदीप कुमार, हरियाणातील निक्की भाटी यांसारख्या अनेक महिलांच्या मृत्यूप्रकरणी त्यांच्या कुटुंबीयांनी हुंड्यासाठी छळ झाल्याचे गंभीर आरोप केले आहेत. या घटनांमुळे पुन्हा एकदा हुंडा प्रथेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**





### भारतातील हुंडाबळीचे चित्र

राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या (NCRB) आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये देशभरात हुंड्याशी संबंधित ५,७३७ मृत्यूंची नोंद झाली. म्हणजेच प्रत्येक एक लाख महिला लोकसंख्येमागे सरासरी ०.८ हुंडाबळी नोंदवले गेले. सर्वाधिक मृत्यूंची नोंद उत्तर प्रदेशात (२,०३८) झाली असून त्यानंतर बिहारमध्ये (१,०७८) प्रकरणे नोंदली गेली. २०१७ ते २०२२ या कालावधीत भारतात दरवर्षी सरासरी सुमारे ७ हजार महिलांचा हुंड्यामुळे मृत्यू झाल्याचे NCRB च्या अहवालात नमूद आहे. तज्ज्ञांच्या मते, अनेक प्रकरणे पोलिसांपर्यंतच पोहोचत नसल्याने प्रत्यक्ष परिस्थिती यापेक्षा अधिक गंभीर असू शकते.

## हुंडाबळीची काही चर्चित प्रकरणे...

- » देशभरात हुंड्यासाठी छळ आणि मृत्यूची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. त्यातील काही मोठ्या प्रमाणावर चर्चा झालेली प्रकरणे अशी :
- » इंदूर (२००६) : भूमी (ऋचा) रामचंदानी हिची हत्या करून मृतदेहाचे दोन तुकडे करण्यात आले होते.
- » प्रयागराज (२०२४) : अंशिका हिचा मृतदेह सासरी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. या प्रकरणात अनेकांना अटक करण्यात आली.
- » ग्रेटर नोएडा (२०२५) : २८ वर्षीय निक्की भाटी हिला जिवंत जाळल्याचा आरोप करण्यात आला.
- » भोपाळ : ३३ वर्षीय ट्विशा शर्मा यांच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी पती, सासू आणि निवृत्त न्यायाधीश असलेल्या सासऱ्यांवर छळाचे आरोप झाले.
- » नोएडा : दीपिका नागर यांचा इमारतीवरून पडून मृत्यू झाला. कुटुंबीयांनी हुंड्यासाठी छळ झाल्याचा आरोप केला.
- » कर्नाटक : बल्लारी जिल्ह्यातील २४ वर्षीय ऐश्वर्या प्रदीप कुमार हिने मानसिक छळाला कंटाळून आत्महत्या केल्याचे समोर आले.
- » ग्वाल्हेर : सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर पलक रजक हिच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी माहेरच्यांनी हत्येचा आरोप केला.



## कायदा असूनही प्रथा कायम

भारतात १९६१ पासून हुंडा देणे आणि घेणे दोन्हीही कायद्याने गुन्हा आहे. तरीही अनेक समाजघटकांमध्ये विवाहावेळी दिल्या जाणाऱ्या वस्तू किंवा रकमेचे ‘भेटवस्तू’ असे स्वरूप देऊन हुंडा प्रथा सुरूच असल्याचे दिसून येते. अनेक ठिकाणी मुलीचे शिक्षण, करिअर किंवा कर्तृत्व यापेक्षा ती किती हुंडा घेऊन आली, यालाच अधिक महत्त्व दिले जाते. सामाजिक प्रतिष्ठा, परंपरा आणि कौटुंबिक दबावामुळे अनेक कुटुंबे मोठ्या प्रमाणावर हुंडा देण्यास भाग पडतात. परिणामी महिलांना छळ, अत्याचार आणि काही वेळा मृत्यूलाही सामोरे जावे लागते. जागतिक बँकेने १९६० ते २००८ या कालावधीत ग्रामीण भारतातील ४० हजार विवाहांचा अभ्यास केला असता, सुमारे ९५ टक्के विवाहांमध्ये हुंडा देण्यात आल्याचे आढळून आले. यावरून ही प्रथा समाजात किती खोलवर रुजलेली आहे, हे स्पष्ट होते.

## भारतीय न्याय संहितेनुसार शिक्षेची तरतूद

भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ८० नुसार, विवाहानंतर सात वर्षांच्या आत एखाद्या महिलेचा भाजल्याने, दुखापतीमुळे किंवा अन्य अनैसर्गिक कारणाने मृत्यू झाला आणि मृत्यूपूर्वी तिला हुंड्यासाठी छळ किंवा क्रूरतेला सामोरे जावे लागल्याचे सिद्ध झाल्यास तो हुंडाबळी मानला जातो. अशा प्रकरणात दोषीला किमान सात वर्षांपासून ते जन्मठेपेपर्यंतची शिक्षा होऊ शकते. तसेच BNS कलम ८६ अंतर्गत महिलेला आत्महत्येस प्रवृत्त करणे, तिच्या शारीरिक किंवा मानसिक आरोग्याला गंभीर इजा पोहोचवणे किंवा पैसे, मालमत्ता अथवा इतर बेकायदेशीर मागण्या पूर्ण करण्यासाठी छळ करणे, यालाही ‘क्रूरता’ मानले जाते आणि त्यानुसार कठोर कारवाईची तरतूद आहे.

# भांडणानंतर जोडीदाराशी बोलणे बंद करता? ‘सायलेंट ट्रीटमेंट’ ठरतो नात्यासाठी घातक!

**नातेसंबंधांमध्ये मतभेद आणि भांडणे होणे ही सामान्य बाब आहे. मात्र, भांडणानंतर आपण जोडीदाराशी कसे वागतो, यावर त्या नात्याचे भवितव्य अवलंबून असते. काही जण राग शांत करण्यासाठी काही काळ बोलणे टाळतात, तर काही जण मुद्दाम समोरच्याला शिक्षा देण्यासाठी किंवा मानसिक त्रास देण्यासाठी संवाद बंद करतात. नातेसंबंध तज्ज्ञांच्या मते, या दोन्ही गोष्टींमध्ये मोठा फरक असून ‘सायलेंट ट्रीटमेंट’ ही सवय काही वेळा नात्यासाठी विषारी (टॉक्सिक) ठरू शकते.**



## दुखावल्यावर थोडा वेळ शांत राहणे चुकीचे नाही

भांडणानंतर एखादी व्यक्ती खूप दुखावलेली किंवा संतापलेली असेल, तर लगेच शांतपणे संवाद साधणे अनेकदा शक्य होत नाही. अशा वेळी स्वतःला सावरण्यासाठी थोडा वेळ घेणे स्वाभाविक आहे. मात्र, कोणतीही माहिती न देता अचानक बोलणे बंद करणे योग्य नाही. जर तुम्हाला थोडा वेळ हवा असेल, तर जोडीदाराला स्पष्टपणे सांगा की, ‘सध्या मला थोडा वेळ हवा आहे. मी शांत झाल्यानंतर आपण या विषयावर बोलू.’ यामुळे समोरच्या व्यक्तीला आपण नात्यापासून दूर पळत नसून स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करत आहोत, हे समजते.

## मतभेद दडपण्यापेक्षा त्यावर चर्चा करा...

राग शांत झाल्यानंतर त्या विषयावर पुन्हा चर्चा करणे आवश्यक आहे. केवळ ‘सॉरी’ म्हणून विषय संपवणे नेहमीच पुरेसे नसते. भांडण नेमके कोणत्या कारणामुळे झाले, कोणत्या गोष्टीमुळे दुखापत झाली आणि भविष्यात अशी परिस्थिती टाळण्यासाठी काय करता येईल, याबाबत मोकळेपणाने संवाद साधणे महत्त्वाचे आहे.

- » ‘सायलेंट ट्रीटमेंट’ कधी ठरते टॉक्सिक? : काही व्यक्ती स्वतःच्या भावना सावरण्यासाठी नव्हे, तर समोरच्याला मानसिक त्रास देण्यासाठी जाणीवपूर्वक मौन बाळगतात. त्यांची अपेक्षा असते की जोडीदाराने वारंवार विचारपूस करावी, समजूत काढावी आणि प्रत्येक गोष्ट त्यांच्या मनाप्रमाणे करावी. अशा प्रकारची शांतता नाते सुधारण्यासाठी नसते; ती समोरच्या व्यक्तीवर नियंत्रण ठेवण्याचा किंवा तिला अस्वस्थ करण्याचा प्रयत्न असतो. अशा वेळी ‘सायलेंट ट्रीटमेंट’ ही विषारी वागणूक ठरते.
- » नात्यावर होणारे दुष्परिणाम : जर प्रत्येक भांडणानंतर एकच व्यक्ती वारंवार कोणतेही कारण न सांगता संवाद बंद करत असेल, तर दुसरी व्यक्ती संभ्रमात पडते. नेमकी चूक काय झाली, हे समजत नाही. अनेकदा ती स्वतःलाच दोष देऊ लागते. कालांतराने दोघांमधील मोकळा संवाद कमी होतो, गैरसमज वाढतात आणि भावनिक दुरावा निर्माण होऊ लागतो. यामुळे नात्यातील विश्वासही कमी होऊ शकतो.
- » ‘स्पेस’ आणि ‘दुर्लक्ष’ यातला फरक समजून घ्या... : प्रत्येक व्यक्तीला कधी ना कधी स्वतःच्या भावना सांभाळण्यासाठी थोडा एकांत किंवा वेळ हवा असतो. मात्र, स्वतःसाठी थोडा वेळ घेणे आणि समोरच्या व्यक्तीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. जर तुम्हाला काही वेळ एकटे राहायचे असेल, तर त्याची कल्पना जोडीदाराला द्या आणि नंतर संवाद साधण्याचे आश्वासन द्या. त्यामुळे समोरची व्यक्ती विनाकारण अस्वस्थ होत नाही आणि नात्यातील विश्वास कायम राहतो.
- » निरोगी नात्यासाठी संवाद महत्त्वाचा : तज्ज्ञांच्या मते, कोणत्याही नात्याचा पाया हा विश्वास आणि मोकळ्या संवादावर उभा असतो. मतभेद होणे अपरिहार्य असले, तरी ते समजुतीने आणि प्रामाणिक संवादातून सोडवण्याचा प्रयत्न केल्यास नाते अधिक मजबूत होते. रागाच्या भरात कायमस्वरूपी मौन धरण्याऐवजी भावना स्पष्टपणे व्यक्त करणे आणि एकमेकांना समजून घेणे, हेच निरोगी नात्याचे खरे लक्षण आहे.



# मराठवाड्याच्या राजधानीत शंकरराव चव्हाण, विलासराव देशमुख यांचे स्मारक उभारण्याची मागणी

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – मराठवाड्याच्या विकासासाठी अनमोल योगदान दिलेले जलक्रांतीचे जनक स्वर्गीय शंकरराव चव्हाण आणि माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे मराठवाड्याच्या राजधानीत भव्य स्मारक व्हावे, या मागणीसाठी काँग्रेस नेते व कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे ठराव घेण्यासंबंधीचे पत्र दिले. त्यानुसार प्रदेशाध्यक्षांनी या दोन्ही नेत्यांचे स्मारक उभारण्याच्या ठरावास मराठवाडा विभागाच्या आढावा बैठकीत मंगळवारी मान्यता दिली.

डॉ.रेखाताई चव्हाण, ड.सुरेंद्र घोडजकर, प्रकाश भगनुरे पाटील,संजय वाघमारे, दीपकसिंग हुजूरिया, प्रवीण केदार, शांतीलाल पवार, प्रमोद सोनवणे यांनी स्मारक उभारण्यासाठी प्रदेशाध्यक्षांकडे पत्र देऊन ठराव घेण्यासंबंधी विनंती केली. त्यास प्रदेशाध्यक्षांनी होकार दिला.

शंकरराव चव्हाण यांना आपल्यातून जाऊन २२ वर्षे झाली आहेत तर विलासराव देशमुख यांचे अकाली



निधन होऊन १४ वर्षे झाली आहेत. या दोन्ही नेत्यांनी मराठवाड्याच्या व महाराष्ट्राच्या विकासात योगदान दिले आहे. छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाड्याच्या राजधानीत या दोन्ही नेत्यांचे भव्य स्मारक व्हावे,अशी मराठवाड्यातील नेते व कार्यकर्त्यांची इच्छा आहे. या स्मारकाच्या माध्यमातून या नेत्यांचे कार्य भावी पिढीला प्रेरणा देईल. त्यामुळे शंकरराव चव्हाण यांच्या १०६ व्या जयंतीचे औचित्य साधून स्मारक उभारण्याविषयीची मागणी करण्यात आली.

छत्रपती संभाजीनगरातील दूध डेअरीच्या परिसरात स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मारकाचे काम सुरू आहे. त्यांच्या शेजारीच शंकरराव चव्हाण आणि विलासराव देशमुख यांचे स्मारक व्हावे, अशी कार्यकर्त्यांची इच्छा आहे. कडक शिस्तीचे भोक्ते असलेल्या शंकरराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे चौथे मुख्यमंत्री, केंद्र सरकारमध्ये गृहमंत्री,अर्थमंत्री,नियोजन आयोगाचे अध्यक्षपद,अशी पदे भूषविलेली आहेत. पाणी आणि ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रात त्यांनी मोठे योगदान दिलेले आहे.

ग्रामपंचायतच्या राजकारणापासून थेट केंद्रीय मंत्र्यांपर्यंत विलासराव देशमुख यांचा प्रवास अत्यंत चांगला राहिला आहे. त्यांनी दोन वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद, केंद्र सरकारमध्ये अवजड उद्योग मंत्रीपद आणि महाराष्ट्रात विविध खात्यांचे मंत्री म्हणून काम केले आहे. या दोन्ही नेत्यांविषयी महाराष्ट्र आणि मराठवाड्याला आपुलकी आहे. त्यामुळे त्यांचे मराठवाड्याच्या राजधानीत स्मारक व्हावे,म्हणून काँग्रेसचे नेते व कार्यकर्त्यांनी आग्रह धरला आहे.

# जिल्ह्यातील आवश्यकतेनुसार नवीन राज्य महिलागृहे उभारावीत

## –महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील महिलांच्या सुरक्षितता व सक्षमीकरणासाठी आवश्यकतेनुसार नवीन शक्तीसदन आणि राज्य महिलागृहांची स्थापना करण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत. ज्या जिल्ह्यांमध्ये शक्तीसदन किंवा राज्य महिलागृह उपलब्ध नाही, अशा जिल्ह्यांना प्राधान्य देऊन ही सुविधा उभारण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

महिलांच्या संरक्षणासाठी केंद्र शासनाची शक्तीसदन योजना आणि राज्य शासनाची राज्य महिलागृह योजना यांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री



तटकरे म्हणाल्या की, राज्यात सध्या २१ शक्तीसदने आणि २२ राज्य महिलागृहे कार्यरत आहेत. नंदुरबार, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, वर्धा आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये राज्य महिलागृह उपलब्ध नसल्याने आवश्यकतेनुसार ती सुरू करण्यात यावीत. प्रत्येक जिल्ह्यात किमान एक राज्य महिलागृह असावे, यासाठी नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

निरीक्षणगृहांतील रिक्त पदांबाबतही त्यांनी आढावा घेतला. एकूण २८८ मंजूर पदांपैकी २१८ पदे भरली असून, उर्वरित रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

शक्तीसदन योजनेअंतर्गत निराधार महिला, लैंगिक शोषण व कौटुंबिक हिंसाचाराच्या बळी ठरलेल्या मुली व महिला, तसेच अनैतिक मानवी व्यापारातून मुक्त करण्यात आलेल्या महिलांना सुरक्षित निवास, अन्न, वस्त्र, वैद्यकीय उपचार, कायदेशीर मदत, समुपदेशन, शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण आणि आर्थिक पुनर्वसन अशा विविध सुविधा स्वयंसेवी संस्थांमार्फत उपलब्ध करून दिल्या जातात.

# होर्मुझ येथील हवाई हल्ल्यात भारतीय इंजिनिअरचा मृत्यू

**तेहरान (वृत्तसंस्था)** – होर्मुझ सामुद्रधुनी येथे मालवाहू जहाजावर झालेल्या हल्ल्यात भारतीय खलाशी हेरंब करमरकर यांचा मृत्यू झाल्याची अधिकृत पुष्टी झाली आहे. रविवारी पहाटे जहाजावर झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर ते बेपत्ता झाले होते. मंगळवारी त्यांच्या कुटुंबियांनी त्यांच्या मृत्यूची माहिती दिली.

पुण्याचे हेरंब करमरकर हे एमव्ही जीएफएस गॅलेक्सी या मालवाहू जहाजावर थर्ड इंजिनिअर म्हणून कार्यरत होते. जहाजावर एकूण २४ कर्मचाऱ्यांचा क्रू होता, त्यापैकी ११ जण भारतीय होते. रविवारी पहाटे ओमानच्या सागरी हद्दीत जहाजावर हल्ला झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, क्षेपणास्त्र थेट जहाजाच्या इंजिन रूमवर आदळल्याने भीषण आग लागली. यामुळे जहाजाची प्रोपल्शन सिस्टिम निकामी झाली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन कर्मचाऱ्यांनी जहाजाला अँकर करून लाईफबोटच्या मदतीने बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर अवघ्या दोन तासांत ओमानच्या रॉयल नेव्हीने २३ कर्मचाऱ्यांची सुखरूप सुटका केली. मात्र, इंजिन रूमजवळ काम करत असलेले हेरंब करमरकर बेपत्ता होते. अखेर त्यांचा मृत्यू झाल्याची कुटुंबियांनी पुष्टी केली. हल्ल्याच्या काही वेळ आधी, रविवारी पहाटे २:४९ वाजता हेरंब यांनी कुटुंबियांशी शेवटचा संपर्क साधला होता. त्यांनी होर्मुझ सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार केली आहे असे सांगितले होते. गेल्या तीन महिन्यांहून अधिक काळ ते समुद्रात कार्यरत होते आणि कामाचा कालावधी पूर्ण करून लवकरच भारतात परतणार होते.

दरम्यान, पश्चिम आशिया परिसरातील वाढत्या तणावामुळे व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. होर्मुझ सामुद्रधुनी ही जगातील सर्वाधिक वर्दळीच्या सागरी मार्गांपैकी एक असून, जागतिक तेल वाहतुकीचा मोठा हिस्सा या मार्गातून होतो. त्यामुळे या भागातील प्रत्येक घटना आंतरराष्ट्रीय स्तरावर चिंतेचा विषय ठरत आहे. या हल्ल्याचा भारताने तीव्र निषेध केला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने नवी दिल्लीतील इराणच्या दूतावासातील उपप्रमुखांना बोलावून अधिकृत निषेध नोंदवला. मंत्रालयाने व्यापारी जहाजे आणि खलाशांना लक्ष्य करणारे हल्ले तात्काळ थांबवण्याची मागणी करत, आंतरराष्ट्रीय जलमार्गांवरील सुरक्षित आणि निर्बंधमुक्त वाहतूक पूर्ववत करण्याचे आवाहन केले आहे.

# एस.टी.ची तिकीट दरवाढ सुरूच राहणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – तिकीट दरवाढ पुढेही सुरू राहणार असल्याचे म्हटले जात आहे. वाढत्या डिझेल किंमतीमुळे एसटी महामंडळाने १० टक्के हंगामी भाडेवाढ ३१ जुलैपर्यंत वाढवली आहे. राज्यात १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत १० टक्के हंगामी भाडेवाढ लागू करण्यात आली. त्याला एक महिन्याचीमुदतवाढ देण्यात आली होती. आता हीच मुद मुदतवाढ ३१ जुलैपर्यंत वाढण्यात येणार आहे.



राज्य सरकारनेएसटी महामंडळाला कर्मचाऱ्यांच्या पगारासह अन्य खर्च स्वतःच भागवण्यासाठी विविध उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या आहेत. तसेच जागतिक युद्धजन्य स्थितीमुळे डिझेलच्या दरात वाढ झाली आहे. बसगाड्यांच्या सुट्ट्या भागांसह टायरच्या किंमतीत वाढ झाली आहे. यामुळे एकूण खर्चाचा विचार करता, भाडेवाढ गरजेची असल्याची भूमिका एसटी महामंडळाची होती.

## टी.सी. हरवली

माझी साजेदा बेगम सखावत अली सय्यद या नावाची तिसरी पासची टी.सी. रेल्वे स्टेशन ते देगलुरनाका ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क**
**मो.नं. ८६६९१८६६०८**

## टी.सी. हरवली

माझी मोहम्मद इशरत अली मोहम्मद युसुफ या नावाची पाचवी पासची टी.सी. रेल्वे स्टेशन ते देगलुरनाका ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता – रा. देगलूरनाका नांदेड**
**मो.नं. ७०२०७०७१४३**

## टी.सी. हरवली

माझी संदिप माधवराव जोशी या नावाची इयत्ता ९ वी नापासची टी. सी. नायगाव ते नांदेडे प्रवास करीत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा.

**: संपर्कासाठी पत्ता :**
**संदिप माधवराव जोशी**
**रा. धनेगाव ता.जि. नांदेड**

## टी.सी. हरवली

माझी समर्थ माधव ढेंगल या नावाची इयत्ता ४ थी पासची टी. सी. तामसा ते भोकर एस. टी. ने प्रवास करीत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा.

**: संपर्कासाठी पत्ता :**
**समर्थ माधव ढेंगल**
**रा. मंजुळानगर ता. भोकर जि. नांदेड मो. नं. ७७९८५८८८३४**

## पासपोर्ट हरवले

माझे खान सद्दाम मुसा खान पठाण या नावाचे पासपोर्ट (पासपोर्ट नं. पी. १०४१०७५) शिवाजीनगर ते विमानतळ सांगवी दरम्यान १० जुलै २०२६ रोजी मोटारसायकल प्रवासात हरवले आहे. ज्यांना कोणाला सापडले असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

– संपर्क पत्ता–
खान सद्दाम मुसा खान पठाण
रा. मकदुम नगर, आबेदीन मस्जिद शिवाजीनगर, नांदेड (महाराष्ट्र)–४३१६०२

## VEHICL FOR SALE

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

| Chassis No. | Year | Model |
|---|---|---|
| 932513568680 | 2023 | TRACTOR EICHER TAFE 548 |

ENGINE NO. 532427490583

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

All offer may of exclusive of TAX where applicable. The purchaser shall have to take all necessary steps for transferring the vehicle in his name with the RTO. Offer should reach us on or before **21/07/2026** Offer reach after the sold date the company reserve the right to reject any or all the offer without assigning any reason what so ever. The company does not undertake any responsibility for non-receipt/loss/delay of offer documents during transit. The offer should be sent to the following address.

SUNDARAM FINANCE LIMITED
IInd Floor, Parmar Complex, Bafna T-Point, Nanded 431601
8108157969, 8108151742

## Change In Name

My Old Name is **ADIBA TARNNUM SK ALEEM** which now I am changing as New Name **ADIBA TARUNNUM SHAIKH ALEEM.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address -** H.No. 1-7-904, Peerburhan Nagar, Near A-1 Kirana Nanded Nanded Maharashtra 431605 Mo.No. 7249398871

## Change In Name

My Old Name is **SYEDA RUSHDA** which now I am changing as New Name **SYEDA RUSHDA SYED MUKHTAR HUSSAIN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address -** H.No.157 , B.No.25 , NEAR N.W.M.C. OFFICE NO.1, LABOUR COLONY , VTC:NANDED, P.O. SHIVAJI NAGAR, TQ. & DIST. NANDED-431602 MAHARASHTRA, INDIA Mobile No. 9730588519

## Change In Name

My Old Name is **SAYYADA MARWAH** which now I am changing as New Name **SYEDA MARWAH SAYED MUKHTAR HUSSAIN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address -** H.No.157 , B.No.25 , NEAR N.W.M.C. OFFICE NO.1, LABOUR COLONY , VTC:NANDED, P.O. SHIVAJI NAGAR, TQ. & DIST. NANDED-431602 MAHARASHTRA, INDIA Mobile No. 9730588519

## Change In Name

My Old Name is **SYEDA ZAINA** which now I am changing as New Name **SYEDA ZAINA SYED MUKHTAR HUSSAIN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address -** H.No.157 , B.No.25 , NEAR N.W.M.C. OFFICE NO.1, LABOUR COLONY , VTC:NANDED, P.O. SHIVAJI NAGAR, TQ. & DIST. NANDED-431602 MAHARASHTRA, INDIA Mobile No. 9730588519

## Change In Name

My Old Name is **MUKARRAM AHMAD** which now I am changing as New Name **MUKARRAM AEIJAZ AHMAD.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address -** Plot No. 55, Gut No. 82, Asra Nagar, Nanded 431605 Maharashtra

**।। जाहीर प्रगटन ।।**
**मा. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, लोहा यांच्या न्यायालयात**
**प्रकरणः – जन्म/मृत्यू नोंद घेणे बाबत.**

| | |
|---|---|
| अ.क्र | |
| अर्ज दिनांक | ०३/०७/२०२६ |
| अर्जदार यांचे नाव | भाऊसाहेब शामराव कल्याणकर |
| अर्जदार यांचेशी असलेले नाते व नाव | पार्वतीबाई श्यामराव कल्याणकर (मुलगा) |
| अर्जदार यांचे विरुध्द ग्रामसेवक / मुख्याधिकारी नगर परीषद | ग्राम पंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय वडगाव |
| मृत्यू दिनांक | ०२/०३/२०१५ |
| मृत्यू स्थळ | वडगाव |
| मृत्यू नोंदणी प्राधिकारी | ग्राम पंचायत अधिकारी ग्रानपंचायत कार्यालय वडगाव |

ज्याअर्थी उपरोक्त वर नमुद अर्जदार यांनी न्यायालयात हजर राहुन जन्म । मृत्यू नोंदणी कायदा २०२३ शासण निर्णय १२ मार्च २०२५ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार । अर्जदार यांचे नातेवाईक यांच्या जन्माची । मृत्यूची नोंद घेण्यासाठी ग्रामसेवक ग्रामपंचायत/मुख्याधिकारी येथे नोंद उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस व सबंधितास कळविण्यात येते. कि, वरील अर्जदार । अर्जदार यांचे नातेवाईक यांच्या नातेवाईक यांच्या जन्माची/ मृत्यूची नोंद वर नमुद ठिकाणी घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास, त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पसून पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा विकालामार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहुन आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल. आज दि. १४/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येत आहे.

**तहसिलदार, लोहा**

**।। जाहीर प्रगटन ।।**
**मा. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, लोहा यांच्या न्यायालयात**
**प्रकरणः – जन्म/मृत्यू नोंद घेणे बाबत.**

| | |
|---|---|
| अ.क्र | |
| अर्ज दिनांक | ०३/०७/२०२६ |
| अर्जदार यांचे नाव | भाऊसाहेब शामराव कल्याणकर |
| अर्जदार यांचेशी असलेले नाते व नाव | शामराव कुशेबा कल्याणकर (मुलगा) |
| अर्जदार यांचे विरुध्द ग्रामसेवक / मुख्याधिकारी नगर परीषद | ग्राम पंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय वडगाव |
| मृत्यू दिनांक | ०९/०६/२०१४ |
| मृत्यू स्थळ | वडगाव |
| मृत्यू नोंदणी प्राधिकारी | ग्राम पंचायत अधिकारी ग्रानपंचायत कार्यालय वडगाव |

ज्याअर्थी उपरोक्त वर नमुद अर्जदार यांनी न्यायालयात हजर राहुन जन्म । मृत्यू नोंदणी कायदा २०२३ शासण निर्णय १२ मार्च २०२५ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार । अर्जदार यांचे नातेवाईक यांच्या जन्माची । मृत्यूची नोंद घेण्यासाठी ग्रामसेवक ग्रामपंचायत/मुख्याधिकारी येथे नोंद उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस व सबंधितास कळविण्यात येते. कि, वरील अर्जदार । अर्जदार यांचे नातेवाईक यांच्या नातेवाईक यांच्या जन्माची/ मृत्यूची नोंद वर नमुद ठिकाणी घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास, त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पसून पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा विकालामार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहुन आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल. आज दि । । २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येत आहे.

**तहसिलदार, लोहा**

## कुत्र्यांचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रकटणाव्दारे कळविण्यात येते की, मौजे किनी ता.भोकर जि. नांदेड येथील मिळकत ज्याचा नगर भूमापन क्रमांक ११२६ असुन सदरील मिळकत पत्रिका एसबाराव विठोबाराव नाईक यांच्या नावे असून आजरोजी एसबाराव व त्यांची पत्नी मयत असून त्यांचा मुलगा माधवराव एसबाराव नाईक यांच्याकडून मुत्यमरेड्डी मुत्यन्ना बद्दमवाड रा. किनी ता.भोकर जि.नांदेड यांनी खरेदी केली असून ते दिनांक १६/०९/२०१३ रोजी आणि त्यांची पत्नी दिनांक २०/१२/२०१५ रोजी मयत झाले असून त्यांनी संचिकेत शपथपत्र दाखल केले असून शपथत्रात खालील प्रमाणे वारस आहेत.

| अ.क्र. | नाव | मयताशी नाते |
|---|---|---|
| १ | व्यंकटरेड्डी मुत्यमरेड्डी बद्दमवाड | मुलगा |

सदरील मिळकती वारसा हक्क कायदयाप्रमाणे वारसांच्या नावे नामांतर करणे करीता उप अधीक्षक भूमी अभीलेख भोकर कार्यालयात अर्ज दिला आहे. तरी सदरचे मिळकतीत कोणाचा हक्क अथवा उजर असेल तर त्यांनी पंधरा दिवसाच्या आत आपला अक्षेप वरील दर्शविलेल्या कार्यालयात नोंदवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीवर वारसांचे नावे नामांतर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**स्वा/–**
**उप अधीक्षक भूमी अभीलेख**
**भोकर ता. भोकर जि. नांदेड**

## Change In Name

My Old Name is **ZARINA BEGUM PATHAN** which now I am changing as New Name **ZARINA BEGUM RAHEMATKHAN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address -** 1-11-42, Road No 26, Near madina masjid, Mastan Pura, Nanded Maharashtra 431602 Mo. No. 9921996034

## Change In Name

My Old Name is **RAHEMAT KHAN PATHAN** which now I am changing as New Name **RAHEMATKHAN LALKHAN PATHAN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address -** 1-11-42, Road No 26, Near madina masjid, Mastan Pura, Nanded Maharashtra 431602 Mo. No. 9921996034

## Change In Name

My Old Name is **SHAIKH MUSA SHAIKH MAHEBOOB** which now I am changing as New Name **SHAIKH MOOSA SHAIKH MAHEBOOB.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - Shaikh Moosa, 1-12-315/1/4, Sailani Baba Colony, Kamareddy Kamareddy 503111 Telangana India**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्याकडून प्रभागनिहाय 'एसआयआर' मतदार नोंदणी शिबिरांची प्रत्यक्ष पाहणी व आढावा

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सध्या देशभरात आणि राज्यात मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ चा कार्यक्रम युद्धपातळीवर सुरू आहे. या राष्ट्रीय मोहिमेच्या अंतर्गत नांदेड शहरातील जास्तीत जास्त नागरिकांना मतदार यादीत नाव नोंदवता यावे, चुका दुरुस्त करता याव्यात यासाठी प्रभागनिहाय विशेष 'SIR' कॅम्प्स (शिबिरे) आयोजित करण्यात आले आहेत.



या शिबिरांच्या पूर्वतयारीचा आणि सुरू असलेल्या प्रत्यक्ष कामकाजाचा आढावा घेण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी बुधवारी विविध प्रभागांमधील कॅम्पला अचानक भेटी दिल्या.

मनपा आयुक्तांनी शहरातील प्रमुख प्रभाग कार्यालयांतर्गत येणाऱ्या शाळा, समाजमंदिरे आणि नियुक्त सरकारी इमारतींमधील 'SIR' कॅम्पला भेट दिली. यामध्ये प्रामुख्याने नरसिंह मंदिर कौठा, नरसिंह विद्यामंदिर व जयभीम नगर यांचा समावेश होता. यावेळी त्यांनी प्रत्येक बाबींची बारकाईने तपासणी केली. प्रत्येक केंद्रावर बुथ लेव्हल ऑफिसर्स, पर्यवेक्षक आणि मदतनीस वेळेत हजर आहेत की नाही याची खात्री केली. तसेच केंद्रांवर आलेल्या स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या शंकेचे निरसर करताना आपले गणना प्रपत्र लवकरात लवकर जमा करण्याचे आवाहन केले.

सहायक मतदान नोंदणी अधिकारी यांनी कॅम्पव्दारे जास्तीत जास्त गणना प्रपत्रांचे संकलन व संगणकीकरण व्हावे यासाठी प्रयत्न करावेत व मनपाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी त्यांना सर्वतोपरी सहकार्य करावे असे निर्देश यावेळी पालिका आयुक्तांनी दिले. तसेच पावसाळ्याचे दिवस पाहता शिबिराच्या ठिकाणी नागरिकांना बसण्यासाठी जागा, पिण्याचे पाणी आणि छताची योग्य व्यवस्था असावी, अशा सुचना यावेळी केल्या. महानगरपालिका प्रशासनातर्फे नांदेडच्या सर्व नागरिकांना विनंती करण्यात येत आहे की, आपल्या बीएलओशी संपर्क साधून आपले गणना प्रपत्र भरुन जमा करावे किंवा आपल्या प्रभागातील जवळच्या 'एसआयआर' कॅम्पला भेट देऊन गणना प्रपत्राच्या संकलनाची व संगणकीकरणाची प्रक्रिया पूर्ण करुन घ्यावी. तसेच लोकशाही बळकट करण्यासाठी आणि शुध्द मतदार यादी तयार होण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे.

या पाहणी दौऱ्याप्रसंगी उपायुक्त नितीन गाढवे, उपायुक्त अजितपालसिंघ संधु, संबंधित सहायक मतदान नोंदणी अधिकारी, संबंधित प्रभागांचे क्षेत्रिय अधिकारी आणि नगरसेवक उपस्थित होते.

## 'मिशन निर्भया' यंदाही राबवा!

### आ. श्रीजया चव्हाण यांची पोलीस अधीक्षकांकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना कायदा व सुव्यवस्थेचे प्राथमिक धडे मिळावेत, अनुचित प्रकार घडत असल्यास पोलिसांशी वेळीच संपर्क साधण्याचे महत्त्व कळावे, या उद्देशाने नांदेड जिल्ह्यातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये मागील वर्षी पोलीस विभागाने राबवलेला 'मिशन निर्भया' हा उपक्रम यंदाही राबविण्यात यावा, अशी मागणी आमदार ॲड. श्रीजया चव्हाण यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्याकडे केली.



आ. चव्हाण यांनी बुधवारी पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन गतवर्षीच्या उपक्रमाचे यश निर्दर्शनास आणून दिले. त्या म्हणाल्या की, 'मिशन निर्भया'मध्ये नांदेड जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक संस्था व क्लासेसमध्ये प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याअंतर्गत विद्यार्थ्यांना कायद्याचे प्राथमिक ज्ञान, सार्वजनिक ठिकाणी घ्यावयाची काळजी, तसेच कोणताही अनुचित प्रकार घडल्यास पोलिसांशी कसा संपर्क साधावा, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले होते. विशेषतः मुलींना छेडछाड किंवा इतर कोणताही त्रास झाल्यास तक्रार कुठे व कशी करावी, याविषयी दिलेल्या माहितीला प्रतिसाद मिळाला होता. या उपक्रमामुळे अनेक मुलींनी निर्भयपणे पुढाकार घेत पोलिसांत तक्रारी दाखल केल्या होत्या. विद्यार्थ्यांसोबतच पालकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले होते.

यंदाचे नवीन शैक्षणिक वर्ष नुकतेच सुरू झाले आहे. किशोरवयीन टप्प्यात मुलांवर योग्य संस्कार होणे ही काळाची गरज असल्याने वाढत्या अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी असे संस्कारक्षम व प्रबोधनात्मक उपक्रम सातत्याने चालवणे आवश्यक आहे. त्यामुळे यावर्षीही नांदेड जिल्ह्यातील सर्वच शैक्षणिक संस्था आणि खाजगी क्लासेसमध्ये कायद्याबाबत जनजागृती करणारा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात यावा, अशी मागणी आ. ॲड. श्रीजया चव्हाण यांनी केली व पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला.

मागील वर्षीही आ. चव्हाण यांनीच हा उपक्रम राबविण्याची मागणी केली होती. त्यानुसार तत्कालीन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी हा उपक्रम राबवला होता. आ. ॲड. श्रीजया चव्हाण यांनी या यशस्वी उपक्रमाचा संदर्भ देत हा उपक्रम संपूर्ण राज्यात राबविण्याची मागणी विधानसभेत केली होती व त्यानंतर अनेक आमदारांनी त्यांची भेट घेऊन या उपक्रमाविषयी जाणून घेतले होते.



**नांदेड –** शिवसेना बीएलए व पदाधिकाऱ्यांची नांदेड दक्षिण विधानसभेच्या वतीने आमदार आनंदराव बोंढारकर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाप्रमुख विजय गिरडे पाटील, तालुकाप्रमुख अशोक मोरे, तालुकाप्रमुख उद्धव शिंदे, युवासेना जिल्हाप्रमुख बाळू पाटील मोरे ब्राह्मणवाडेकर, शहर प्रमुख सुहास खराणे पाटील, अवतारसिंग पहरेदार, दिलीपसिंग सोडी, गुरमीतसिंग तमन्ना, गंगाबिषण कांकर आदी उपस्थित होते. **(छाया : नरेंद्र गडप्पा, नांदेड)**

## डॉ. गीता लाठकर यांना प्रो. इंदिरा पारीख महिला नेतृत्त्व पुरस्कार



**नांदेड (प्रतिनिधी) –** एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालय नांदेड तसेच एमजीएम अभियांत्रिकी आणि तंत्रशास्त्र महाविद्यालय नवी मुंबईच्या प्रभारी डायरेक्टर डॉ. गीता लाठकर यांना वर्ल्ड एज्युकेशन काँग्रेस मुंबई या संस्थेचा प्रतिष्ठित प्रोफेसर इंदिरा पारीख, शिक्षण क्षेत्रातील महिला नेतृत्त्व पुरस्कार नुकताच मुंबई येथे प्रदान करण्यात आला आहे.

डॉ. गीता लाठकर यांनी मेकॅनिकल इंजिनिअरींगमधील पदवी, पदव्युत्तर आणि पीएच. डी. आदी पदव्या प्राविण्यासह उत्तीर्ण केल्या आहेत. डॉ. गीता लाठकर यांनी सीएमआयटी, एएसएमई, इंडो–यूएस फोरम, आयएसटीई, एएमटीडीआर अशा अनेक शैक्षणिक संस्थेसोबत काम केले असून, त्या अनेक व्यावसायिक संस्थेच्या सदस्याही आहेत.

त्यांनी स्वारातीम विद्यापीठात सिनेट, अॅकडमिक काऊन्सील, बोर्ड ऑफ स्टडीज, परीक्षा मंडळ आदींवरही काम केले आहे. डॉ. गीता लाठकर १९८४ पासून एमजीएम संस्थेत विविध जबाबदाऱ्या सांभाळत असून, त्यांच्या मार्गदर्शनात आजवर ११ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. पूर्ण केली आहे. तसेच ८ विद्यार्थी संशोधन करीत आहेत. त्यांचे ५० हून अधिक संशोधन पेपर्स राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नियतकालिकांतून आणि प्रोसिडींगमधून प्रकाशित झाले आहेत.

## सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला पाठिंबा; नांदेडमध्ये आज बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)–** शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांनी नीट पेपरफुटीच्या विरोधात व शिक्षण क्षेत्रातील काळाबाजाराला सरकार जबाबदार धरून गेल्या १७ दिवसांपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. सोनम वांगचुक यांची प्रकृती चिंताजनक बनली आहे. त्यांना पाठिंबा देण्यासाठी देशभरातील युवक २० जुलै रोजी संसदेला घेराव घालणार आहेत. या आंदोलनाला समर्थन देण्यासाठी नांदेड येथे सत्याग्रह करण्यात येणार आहे. सत्याग्रहाच्या तयारीसाठी गुरुवार, १६ जुलै रोजी दुपारी ४ वाजता नांदेड शासकीय विश्रामगृह येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

## नेताजी पालकर यांच्या स्मारकासाठी 'छावा'तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण

**नांदेड (प्रतिनिधी) –** स्वराज्याचे सरसेनापती नेताजी पालकर यांच्या तामसा (ता. हदगाव) येथील उपेक्षित समाधी स्थळाचा विकास करून तिथे उच्च दर्जाचे स्मारक उभारण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी 'छावा' संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण आणि डॉ. राजेंद्र दाते पाटील व इतर पदाधिकारी गुरुवार, दि.१६ जुलै रोजी सकाळी ११ वाजता नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसणार आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील पराक्रमी सरसेनापती नेताजी पालकर यांचा देदीप्यमान इतिहास सर्वश्रुत आहे. आग्रा प्रकरणापासून ते पुन्हा स्वराज्यात येण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे. त्यांच्या उत्तर आयुष्यातील स्मृतीशी जोडलेले तामसा हे गाव त्यांच्या जहागिरीचा एक मुख्य भाग होते आणि याच भूमीत त्यांची समाधी आहे.

परंतु, अत्यंत खेदाची बाब म्हणजे स्वराज्यासाठी आयुष्य खर्ची घालणाऱ्या या महान सेनापतीच्या समाधीकडे जाण्यासाठी आज एक साधी नीट वाटही उपलब्ध नाही. नदीकडील बाजूने व गावातून येणारे रस्ते अत्यंत खराब असून, मूलभूत सुविधांचा अभाव आहे. हा महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाचा घोर अपमान असून, सार्वजनिक जतन धोरणाचा ढिसाळपणा दाखवणारा असल्याने याकडे लक्ष वेधण्यासाठी छावा संघटनेने विविध मागण्या केल्या आहेत.

समाधी स्थळाचा तातडीने पुरातत्त्वीय सर्वे करून शासकीय नोंद व्हावी आणि नेताजी पालकरांच्या जन्म–मृत्यूचा अधिकृत तपशील जाहीर करावा, गावातील आणि नदीकडील बाजूच्या मुख्य रस्त्याचे डांबरीकरण/सिमेंटीकरण करून वाहतूक सुलभ करावी, निधी व संवर्धन: समाधीच्या दुरुस्ती, संवर्धन आणि सुशोभीकरणासाठी स्वतंत्र निधी मंजूर करावा, स्मारक परिसरात ग्रंथालय, कुंपण, माहितीफलक, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि प्रकाशव्यवस्था करावी, या क्षेत्राला 'ऐतिहासिक वारसा स्थळ' म्हणून घोषित करून स्मारकासाठी आवश्यक जमीन अधिगृहीत करावी, दरवर्षी शिवजयंती व इतिहास दिनाला येथे शासकीय स्तरावर अधिकृत स्मृती कार्यक्रमांचे आयोजन करावे, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्मारक सल्लागार समिती स्थापन करावी यांसह अन्य प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

नेताजी पालकर यांचे जीवन महाराष्ट्राच्या पराक्रम आणि स्वराज्यनिष्ठेचे प्रतीक आहे, अशा ऐतिहासिक स्मारकाची दुरवस्था होणे ही संपूर्ण महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी बाब आहे. या जागेचा जीर्णोद्धार करणे ही शासनाची आणि प्रशासनाची नैतिक व सांस्कृतिक जबाबदारी आहे, अशी भावना छावा संघटनेचे किशोर चव्हाण व डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## बायनाबाई बोकारे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी) –** येथील नानक–साई फाऊंडेशनचे प्रमुख तथा ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ बोकारे यांच्या मातोश्री बायनाबाई नामदेवराव बोकारे यांचे बुधवार, दि. १५ जुलै २०२६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ९५ वर्षांच्या होत्या.

त्यांच्या पार्थिवावर गुरुवार, दि. १६ जुलै रोजी दुपारी २ वाजता नांदेड तालुक्यातील सोमेश्वर येथे अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या मागे तानाजी बोकारे, देविदास बोकारे, पंढरीनाथ बोकारे, प्रा. दत्ता बोकारे व दोन मुली, नातू, पणतू असा परिवार आहे.

## चिटमोगरा येथे अवैध उत्खनन करताना जेसीबी जप्त; दोन ट्रॅक्टर फरार

**शंकरनगर (प्रतिनिधी) –** बिलोली तालुक्यातील मौजे नवीन चिटमोगरा येथील शासकीय गायरान जमीन (गट क्र. १४८) अवैध मुरूम उत्खननामुळे पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. महसूल विभागाने मध्यरात्री टाकलेल्या धाडीत अवैध उत्खनन करत असलेली एक जेसीबी जप्त करण्यात पोलिसांना यश मिळाले, मात्र दोन ट्रॅक्टर घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाले. या कारवाईनंतर अवैध उत्खननाच्या रॅकेटवर प्रशासन कितपत कठोर कारवाई करणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार १४ जुलैच्या मध्यरात्री शासकीय गायरान जमिनीवर जेसीबी आणि ट्रॅक्टरच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात अवैध मुरूम उत्खनन सुरू असल्याची गोपनीय माहिती ग्राम महसूल अधिकारी एस. बी. घोंगडे यांना मिळाली. त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली असता, जेसीबी आणि दोन ट्रॅक्टरद्वारे मुरूम उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले.

पंचनामा करण्यासाठी पोलीस पाटील व गावातील प्रतिष्ठित नागरिकांना घटनास्थळी बोलावण्यात आले. मात्र कारवाईदरम्यान जेसीबी चालक, ट्रॅक्टर चालक आणि काही नागरिकांनी महसूल अधिकाऱ्यांशी वाद घालत, यापूर्वी झालेल्या उत्खननावर कारवाई का केली नाही? असा सवाल उपस्थित करून कारवाईत अडथळा आणण्याचा प्रयत्न केल्याचे सांगण्यात येत आहे. तरीही महसूल अधिकाऱ्यांनी धैर्याने कारवाई करत जेसीबी जप्त करून रामतीर्थ पोलीस ठाण्यात जमा केली.

या प्रकरणी शशीपाल गंगाधर तोटरे (रा. धामणगाव, ता. मुखेड, जि. नांदेड) यांच्याविरुद्ध रामतीर्थ पोलीस ठाणे आणि बिलोली तहसील कार्यालयात ग्राम महसूल अधिकारी एस. बी. घोंगडे यांनी तक्रार दाखल केली आहे. फरार ट्रॅक्टरची ओळख पटवून संबंधितांवरही गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

दरम्यान, बिलोली तालुक्यासह शंकरनगर परिसरात रात्रीच्या अंधारात मोठ्या प्रमाणावर अवैध रेती व मुरूम उत्खनन सुरू असल्याचे आरोप वारंवार होत आहेत. शासनाचा महसूल बुडवून नैसर्गिक संपत्तीची लूट होत असताना प्रशासनाने व्यापक मोहीम राबवून मुरूम माफियांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## रोडरोमिओंच्या बंदोबस्तासाठी किनवट पोलिसांची मोहीम



**किनवट (प्रतिनिधी) –** किनवट व गोकुंदा येथील शाळा, महाविद्यालये, आयटीआय, कोचिंग क्लासेस आणि आदिवासी विकास व संशोधन केंद्र परिसरात दुचाकीवर हैदोस घालणाऱ्या रोडरोमिओंच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलिसांनी दि. १४ जुलैपासून गस्त सुरू केली आहे.

नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, भोकरच्या अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, किनवटचे उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली किनवटचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी किनवट शहरातील शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेस परिसरातील आणि गोकुंदा शहरातील शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस, आयटीआय, बळीराम पाटील महाविद्यालयातील मुलींचे वसतिगृह, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांचे कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास संशोधन केंद्र, अशा विविध ठिकाणी हैदोस घालणाऱ्या रोडरोमिओंच्या मुसक्या आवळण्यासाठी पथक नेमून दि.१४ जुलै रोजी गस्त सुरू केली आहे.

## १३ व्या वर्धापनदिनानिमित्त गोदावरी फाऊंडेशनच्या वेबसाईटचे व स्वयंचलित पासबुक मशीनचे लोकार्पण

**नांदेड (प्रतिनिधी) –** गोदावरी अर्बनच्या मुख्य शाखेच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित उद्यमी ग्लोबलचा 'उद्योगिनी संवाद अभियान' उत्साहात पार पडले. यावेळी गोदावरी फाऊंडेशनच्या अधिकृत वेबसाईटचे लोकार्पण, ग्राहकांसाठी स्वयंचलित पासबुक प्रिंट मशीनचे उद्घाटन तसेच उद्यमी ग्लोबल फाऊंडेशनच्या महिला सदस्यांना आय–कार्डचे वितरण करण्यात आले. याशिवाय विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या यशस्वी उद्योजिकांचा सन्मानही करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोदावरी अर्बनच्या अध्यक्षा राजश्री पाटील होत्या. प्रमुख उपस्थितीत आमदार हेमंत पाटील, व्हाईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, सचिव रविंद्र रगटे, संचालक प्रा. सुरेश कटकमवार, साहेबराव मामिलवाड, वर्षा देशमुख, कमलताई पाटील, नगरसेविका मीनल पाटील, नैन्सनच्या प्रमुख सुमलताराव, उपसर व्यवस्थापक सुरेखा दवे, ए.आर.के. उद्योग समूहाचे अध्यक्ष रितेश जुजाराव, उद्यमीच्या संचालक किर्ती तगडपलेवार, निता कटकमवार, रेवती रगटे, विजया बोरसे, अरुणा पुंड, प्रतीक्षा पतंगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोपात राजश्री पाटील म्हणाल्या, जोपर्यंत आपण एकत्र येत नाही, तोपर्यंत मोठे कार्य उभे राहत नाही. गोदावरी अर्बनच्या मुख्य शाखेचे आज १३ व्या वर्षात पदार्पण करत असून संस्थेच्या प्रत्येक शाखेचा विस्तार वटवृक्षाप्रमाणे झाला आहे. त्याच धर्तीवर 'गाव तिथे उद्योजिका' या संकल्पनेतून उद्यमी ग्लोबल फाऊंडेशन कार्य करणार आहे. राज्यातील प्रत्येक महिलेला हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत नाविन्यपूर्ण उद्योग, कौशल्य विकास, प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी संस्था कार्यरत राहील. परिश्रम, जिद्द, निष्ठा आणि प्रामाणिक प्रयत्नांच्या जोरावर प्रत्येक महिला यशस्वी उद्योजिका होऊ शकते. यावेळी त्यांनी उद्यमी ग्लोबल फाऊंडेशनच्या वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहितीही दिली.

गोदावरी फाऊंडेशनच्या वेबसाईटच्या लोकार्पणावेळी आ. हेमंत पाटील म्हणाले, प्रत्येक जिल्ह्याची स्वतःची वैशिष्ट्ये आणि स्थानिक संसाधने असतात. त्या भागातील सहज उपलब्ध कच्च्या मालावर आधारित उद्योगांची निवड केल्यास व्यवसाय अधिक यशस्वी ठरतो. महिलांनी पारंपरिक खाद्यपदार्थ, वाळवण आणि स्थानिक उत्पादनांवर आधारित लघुउद्योग सुरू करावेत. उद्योगासाठी मोठ्या भांडवलापेक्षा योग्य नियोजन,स्थानिक कच्चा माल, बाजारपेठ आणि मेहनत अधिक महत्त्वाची आहे. छोट्या उद्योगातूनही मोठे यश मिळू शकते. उद्यमी ग्लोबल फाऊंडेशनचा हा उपक्रम कौतुकास्पद असून या कार्यासाठी माझे पूर्ण सहकार्य राहील.लोकार्पणावेळी संदीप काळे म्हणाले, राजश्री पाटील यांनी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी जागतिक स्तरावरील व्यासपीठ उभारण्याचा दूरदृष्टीपूर्ण पुढाकार घेतला आहे.

## डॉ. मोहन चव्हाण मानद डॉक्टरेटने सन्मानित



**नांदेड (प्रतिनिधी) –** राष्ट्रीय बंजारा परिषदचे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच प्रदेश संयोजक तांडा वस्ती संपर्क अभियान भाजपाचे डॉ. मोहन चव्हाण यांना भारत व्हर्च्युअल युनिव्हर्सिटी फॉर प्लेस अँड एज्युकेशन बेंगलोरच्या वतीने सामाजिक सेवेबद्दल मानद डॉक्टरेटने सन्मानित करण्यात आले. बंगरूळ येथे हा दीक्षांत समारंभ नुकताच पार पडला.

डॉ. मोहन चव्हाण यांनी सामाजिक, शैक्षणिक, रोजगार, ग्रामीण विकास घटकांच्या समीकरणासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन हा राष्ट्रीय सन्मान बहाल करण्यात आला. त्यांनी तांड्यावरची होळी हा उपक्रम महाराष्ट्रातील सर्व तांड्यावर राबविला. तसेच बंजारा समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत त्यांनी भारतभर पोहोचून समाजाच्या विकासासाठी अनेक उपक्रम राबविले. बंजारा समाजाच्या जनहिताच्या विषयावर सक्रियपणे कार्यरत आहेत. बंगळूर येथे पार पडलेल्या सभारंभात डॉ. मोहन चव्हाण यांना मानद डॉक्टरने सन्मानित करून त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com